| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ३५ वा | रविवार, दिनांक १९ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे



## लातूरचे माजी महापौर सुरेश पवार यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरचे माजी महापौर सुरेश पवार यांचे निधन झाले. ते मनमिळावू तसेच नागरिकांचा थेट संपर्क असणारे नेते होते. त्यांचे निधन रविवारी सकाळी झाल्याचे समजताच अनेकांना तीव्र दुःख झाले. महापौर असताना त्यांनी विविध योजना कार्यान्वित केल्या होत्या.

सुरेश पवार हे तात्या नावाने सुपरिचित होते. हणमंतवाडी परिसरात त्यांची चांगली लोकप्रियता होती. कोणीही त्यांच्याकडे आल्यास ते मदतच करीत. काँग्रेसमध्ये दिर्घ काम केल्यावर ते भाजप मध्ये आले ते महापौर बनले. त्यांच्या कामामुळे नेत्यांचा पाठिंबा सतत असत. मनमिळावू व हसरा चेहरा सारखा लातूरकरांच्या स्मरणात राहणार आहे. तात्याच्या आकस्मिक निधनाने अनेकांना धक्का बसला आहे. अनेक मान्यवरांनी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली आहे. सत्ताधारी व विरोधी पक्षाचे नेते व कार्यकर्ते त्यांना मानत असत. काही वर्षापूर्वी त्यांच्या पत्नीचे निधन झाले होते. तरीही तात्या जनतेचे जोमाने काम करताना दिसत होते. एक मनमिळावू व हसऱ्या चेहऱ्याचा तात्या आपल्यातून निघून गेल्याचा विश्वास कोणालाही बसत नव्हता. या वृत्ताबाबत अनेकांनी खात्री करून घेतली जात होती. त्यांच्या निधनाबाबत अनेकांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राष्ट्राला उद्देशून संबोधन म्हणजे विरोधकांना मोठी चपराक: उपमुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेससारख्या पक्षांच्या स्वार्थी राजकारणाचा फटका देशातील महिलांना बसला. या साऱ्या घटना २१व्या शतकातील महिला पाहात आहेत आणि त्या योग्यवेळी उत्तर देतील अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात केली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालीच महिलांना त्यांचा हक्क आणि स्वाभिमान मिळणार यात काही शंकाच नाही. शिवसेना या लढाईमध्ये एनडीए सरकारच्या खांद्याला खांदा लावून आघाडीवर असेल, हे मात्र नक्की, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.



लोकसभेत नारी शक्ती वंदन विधेयक नामंजूर करून देशातल्या महिलांचा अपमान करणारी जी घटना घडली, त्यानंतर आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेले संबोधन म्हणजे विरोधकांना मोठी चपराक आहे. महिलांचे अधिकार हिरावले जात असताना विरोधकांनी आनंद व्यक्त करणे ही अत्यंत खेदजनक बाब होती. पंतप्रधान मोदी यांनी स्पष्टपणे सांगितल्याप्रमाणे, हा केवळ एका विधेयकाचा पराभव नाही, तर नारीच्या स्वाभिमानावर झालेला आघात आहे, पण हा अडथळा फार काळ राहणार नाही, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, महिला आरक्षणाच्या आडून मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आणण्याचा प्रयत्न करणा-या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्राला संबोधण्याच्या नावाखाली देशातील जनतेला प्रचारकी थाटातील आपले भाषण ऐकवले. ३० मिनिटांच्या भाषणात मोदीजींनी ५८ वेळा काँग्रेसचे नाव घेतले आणि आपल्या नेहमीच्या सवयीने त्यांनी खोटे दावे केले. महिला आरक्षणाच्या नावाखाली मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आणून देशाची निवडणूक संरचना बदलून संविधान आणि लोकशाही मोडीत काढण्याचा मोदी सरकारचे कुटील कारस्थान उघड झाले आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

## थाटामाटात नामफलक अनावरण; भव्य आतिषबाजीने उजळला बसवेश्वर चौक

**लातूर/प्रतिनिधी :** जगतज्योती महात्मा बसवेश्वर महराज यांच्या जयंतीनिमित्त बसवेश्वर चौक येथे नव्या एलईडी नामफलकाचे थाटामाटात अनावरण पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यावेळी करण्यात आलेल्या भव्य आतिषबाजीने संपूर्ण परिसर दणाणून गेला आणि उपस्थित नागरिकांनी जल्लोषात सहभाग घेतला.

महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात उपाध्यक्ष विश्वास आंबेकर यांनी स्वखर्चातून एलईडी नामफलक उभारण्यासाठी मोठे योगदान दिले. शनिवारी रात्री मान्यवरांच्या उपस्थितीत या आकर्षक फलकाचे अनावरण करण्यात आले.

या प्रसंगी आमदार अभिमन्यू पवार,काँग्रेसचे राज्य सचिव श्रीशैलदादा उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, नगरसेवक विकास कांबळे, आदिती पाटील कव्हेकर, ऋषिकेश राजे, सत्यवती ताई चेवले, शोभाताई पाटील, संगीता मिरचे, राजश्री धोत्रे, राम स्वामी, श्रीकांत रांजणकर, ओमप्पा धरणे, ॲड. गंगाधरप्पा हामने, बसवंतप्पा भरडे, बाबुअप्पा सोलापूरे, भीमाशंकर देवणीकर, विनय जाकते,



मीनाताई गायकवाड आदींसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष ॲड. निलेश मुचाटे यांनी केले, तर सूत्रसंचालन ओमप्रकाश झुरळे व ओमकार मेंगशेट्टे यांनी प्रभावीपणे पार पाडले. आभार प्रदर्शन बसवेश्वर हेंगणे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ॲड.निलेश मुचाटे, स्वागताध्यक्ष प्रा. भालचंद्र येडवे पाटील, उपाध्यक्ष विश्वास आंबेकर, सचिव बालाजी झिपरे, सहसचिव रोहीत चवळे, कोषाध्यक्ष लखन कावळे, कार्याध्यक्ष मुकेश उटगे, बालाजी पाटील रायवाडीकर, गणेश हेरकर, संयोजक नितीन मोहनाळे, जगदीश येरटे, सोमेश्वर ईश्वरशेटे, शिवकुमार रोडे, प्रमोद धुपे, लक्ष्मीकांत रासुरे, मन्मथ सोरटे, सुशील वेळापुरे, निखिल शेटकार, शरणाप्पा अंबुलगे, कल्याण लातूरे, सुनील ताडमाडगे, किरण खोबरे, सतीश पाटील, महेश आंबुलगे, बसवेश्वर हलकुडे, तानाजी झुंजे पाटील, दत्ता स्वामी, दत्ता चेवले, मनोज मोटे, ॲड. सचिन हुरदळे, प्रदीप उपासे आदींसह समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

या दिमाखदार सोहळ्यामुळे बसवेश्वर चौक नव्या एलईडी नामफलकामुळे अधिक आकर्षक बनला असून नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### अशोक खरातचा जेलमधील मुक्काम वाढला


**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत पुन्हा वाढ झाली आहे. महिला अत्याचाराच्या पाचव्या गुन्ह्यात विशेष तपास पथकाने ताबा घेतल्यानंतर, खरातला आज न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपी अशोक खरातला २३ एप्रिलपर्यंत म्हणजेच ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### प्रभात किरणे

महात्मा बसवेश्वर लोकशाहीचे जनक न्यायासाठी निर्माण केले अनुभव मंडप समता स्वतंत्र बंधुता निर्मिता, रुजविता अंधारातील बहुजनाचा सूर्य,प्रकाश दीप

-इंजि. नागनाथ कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मी नरसिंह मंदिरात आरती



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त लातूरचे पत्रकार श्री हरीराम कुलकर्णी यांच्या वतीने श्री उत्तरादिमठ येथील लक्ष्मी नरसिंह मंदिरात आरती अभिषेक करण्यात आला यावेळी उत्तरादिमठ मठाधिकारी पंडित रघुत्तम आचार्य यांनी मंत्रोच्चार करून आशीर्वाद दिले

यावेळी मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक अप्पा काळे, जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविन्दपुरकर, पत्रकार हरीराम कुलकर्णी, मांजरा साखर कारखान्याचे संचालक दयानंद बिडवे, संचालक सुरेश चव्हाण, निवृत अभियंता सिधोपंत मोरखंडीकर,पंडित रघुत्तमआचार्य जोशी, पंडित श्रीपाद हलगरकर भक्त भाविक उपस्थित होते

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सपत्नीक शिर्डी येथे साईनाथाचे घेतले दर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब व त्यांच्या सुविध पत्नी सौ सुवर्णाताई दिलीपरावजी देशमुख यांनी आज ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने शनिवारी शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले मनोभावे प्रार्थना व आरती केली यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब व सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.





### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यात २० ते २२ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता

### चिमटा दयाचा



शाळेचे गणवेश ठराविक दुकानातून घेण्याचा आग्रह संस्थावाले करतात ! आर्थिक झळ मात्र पालकास सोसावी लागते!!

## संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सज्ज राहवे; रेन वॉटर हार्वेस्टिंग, विहीर पुनर्भरण मोहीम हाती घ्यावी-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी मॉन्सून कालावधीत सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविला जात आहे. त्यामुळे संभाव्य पाणी टंचाई व मॉन्सूनचे उशिरा आगमन होण्याची शक्यता लक्षात घेवून पाणी पुरवठ्याबाबत सूक्ष्म नियोजन करावे. उपलब्ध जलसाठ्याचा वापर काटकसरीने करणे आवश्यक असून त्यासाठी जनजागृतीवर भर द्यावा. तसेच मॉन्सून पूर्वी जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग, विहीर पुनर्भरण मोहीम हाती घेण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या.

लातूर जिल्ह्यातील विविध विकास कामे व संभाव्य पाणी टंचाईबाबत पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार यांची या बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थिती होती. तसेच जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा



उषाताई पाटील तळेगावकर, महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणच्या अधीक्षक अभियंता तथा प्रशासक रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सद्यस्थितीत पाणी टंचाईची तीव्रता कमी असली तरी जिल्ह्यातील काही गावांमध्ये टंचाईची समस्या जाणवू लागली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, तिथे तातडीने उपाययोजना मंजूर करून नागरिकांना पाणी पुरवठा करावा. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सध्या अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती, गळती रोखणे यासारख्या कामांना प्राधान्य देवून पाण्याचा अपव्यय टाळावा, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी दिल्या. लातूर शहराला स्वच्छ पाणी पुरवठा होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. यासाठी आवश्यक प्रयोगशाळा उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिल्या जाईल, असे त्यांनी सांगितले.

सद्यस्थितीत महावितरणने पाणी पुरवठा योजनांची वीज खंडित करण्याची कार्यवाही करू नये. तांड्यावरील पाणी टंचाई निवारणासाठीही विशेष उपाययोजना हाती घेण्याची गरज आहे. यासाठी तातडीने सर्वे क्षण करून पुढील कार्यवाही हाती घ्यावी. बंधारे, तलावातील गाळ उपसा करण्याची कार्यवाही मोहीम स्वरुपात राबवावी, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

**अपूर्ण पाणी पुरवठा योजनांना गती द्यावी : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील**

चाकूर, चापोली, हाडोळती, किनगाव यासारख्या मोठ्या पाणी पुरवठा योजनांची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत, या योजनांच्या कामांना गती द्यावी. तसेच इतरही पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती हाती घेणे गरजेचे आहे. तसेच विद्युत देयके थकीत असल्याने एकही पाणी पुरवठा योजना बंद आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजना सौरउर्जेवर कार्यान्वित कराव्यात, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले. तसेच जिल्ह्यातील पांदन रस्त्यांच्या कामांनाही गती द्यावी, असे ते म्हणाले.

लातूर जिल्ह्यातील भूजल पातळीत वाढ होण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याची गरज आहे. यासोबतच जिल्ह्यात काही ठिकाणी ब्रीज कम बंधारे उभारून जलसंधारणाला हातभार लावण्याची आवश्यकता आहे. रेन वॉटर हार्वे स्टिंग, विहीर पुनर्भरण आदी कामे मोहीम स्वरुपात हाती घेवून शेतकरी, नागरिकांना यासाठी प्रोत्साहित करावे, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. तसेच लातूर शहराला स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात असे ते म्हणाले.

औसा तालुक्यातील भंगेवाडी, महादेववाडीसह इतर ठिकाणी पाणी टंचाई जाणवू लागल्याने उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. महादेववाडी येथील पाणी टंचाई निवारणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच किलारी पाणी पुरवठा योजनेला अनेक ठिकाणी गळती असल्याने पाणी वाया जात आहे. आगामी मॉन्सून कालावधीत पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असल्याने जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी जनजागृती करावी, असे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## अगोदरच काळजी घेतली जात नाही

भारत असा देश आहे की, घटना घडल्यावर मोठी काळजी घेतो. लक्ष ही दिले जाते. सर्व काही नियोजन बद्ध केले जाते. घटना घडण्यापुर्वी कोणतीही काळजी घेतली जात नाही. ती जर पुर्व नियोजन, खबरदारी घेतली तर अनुचित प्रकार घडणार नाही. नाशिक प्रकरण गाजत आहे. हे काही दोन-तीन महिण्यात घडत असलेला प्रकार नाही. तो अनेक वर्षापासून चालत आलेला प्रकार असावा. मुळात अनेक बाबीवर सरकारचे अंकुश नाही. केवळ टिका होते, टिका का होते. यावर चिंतन होताना दिसून येत नाही. एखादी बातमी वृत्तपत्रातून छापून आली त्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. पुर्वीची नेतेमंडळी, मोठी राजकारण वृत्तपत्र वाचत असत त्यानंतर दिवसाची सुरवात करीत. आता कोणीतरी सांगावे लागते, साहेब बातमी आली आहे. लोकशाहीचा चौथ स्तंभ यासाठी म्हटला जाते. प्रत्येक चांगली-वाईट घटनेची बातमी आलेली असते. ती सोशाल मिडीयावर असो अन्य खबऱ्यामार्फत असो त्याची दखल घेतली पाहिजे. पुर्वी काही महत्त्वाची कात्रण निघत असत ती संबंधितास माहिती-खुलाशासाठी पाठवत असते असे काम आता होते का नाही ते माहिती नाही मात्र पुर्वीची जशी दखल घेतली जात होती ती आता दिसून येत नाही. म्हणून अप्रिय घटना घडल्यानंतर सर्वांना कळते. मग कायदेशीर कारवाई सुरु होते. अजूनही काही बाबी अप्रिय बाब घडत आहेत. याचे पायमुळे खोलवर आहेत. परदेशातून फंड येत आहे. त्याच्यामदतीने देशविरोधी कारवाई घडत आहेत हे सरकारला माहिती असणे आवश्यक आहे. सरकारने आपले डोळे उघडे ठेवुन वाटचाल केली पाहिजे. मुळात आपल्या देशात अनेक बाबी दुर्दैवी घटना घडल्यावर मलपट्टी केली जाते. इतर देशात घटना घडण्यापुर्वी दुश्मनाचा प्लॅन नष्ट केला जातो. काही बाबतीत सरकारचे योग्य पावुल पडत आहे. नाशिक मधील अतिषय घृणास्पद घटना आहे. मनाला चटका लावणारी आहे. ज्यावेळी मुलीच्या आईला संशय येतो त्यावेळी जागृतता निर्माण होवून सावध होते, पोलिस यंत्रणेचे आभार मानायाला पाहिजे की, त्यांनी व्यवस्थित प्रकरण हाताळले. लागतीच कारवाई न करता काही पोलिस कर्मचारी नाशिकच्या सदरील कार्यालयात कामानिमित्त पाठविले. माहिती घेतली, सत्यता पडताळून घेतली नंतर कारवाई केली. ही कारवाई काही अविचारी मंडळी चुकीचे म्हणतात. चुकीचे ठरवित आहे. राज्यात नाशिक नाही तर अनेक जिल्ह्यात असा प्रकार असण्याची शक्यता आहे. याची व्याप्ती अधिक असण्याची शक्यता आहे. भारतात अनेक जाती समाज राहातो. ठराविक जात व समाज हा देशविरोधी कामे का हाती घेत आहे हे कळून येत नाही. यापासून काय साध्य करावयाचे आहे हे कळून येत नाही. शिक्षणाच्या बाबतीत तसे दिसून येते. त्यांच्या शाळा आहेत त्यातून काय शिकविले जाते. याचा सरकारला अंदाज नाही. वास्तविक ज्यावेळी देशाला आझादी मिळवायाची होती त्यावेळी सर्व जात व समाज एक होवून लढला व देशाला स्वातंत्र्य मिळवुन दिले. आलिकडे केवळ द्वेश भावना कशासाठी निर्माण केली जात आहे हे कळून येत नाही. मुळात असे प्रकार करण्याची गरज नाही. नाशिकमध्ये ज्यावेळी आई म्हणजे मुलीमध्ये जो बदल दिसून आला त्यावेळी आश्चर्य वाटू लागले. अहिंदुसारखी वागणुक पाहून धक्का जाणवला, असे मत व्यक्त करते. अतिषय वाईट बाब आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी पोलिस यंत्रणेला पाठबल दिले म्हणून असे प्रकरण बाहेर येवू लागले. राज्यात अनेक प्रकरण असे असू शकते. त्याचाही छडा लावला पाहिजे. पहिल्यांदा काही शैक्षणिक संस्थेतून काय ज्ञान दिले जाते याचा अभ्यास राज्य सरकारने केला पाहिजे. राष्ट्रीय विचाराची पिढी निर्माण झाली पाहिजे. या बाबत चिंतन केले पाहिजे. राज्यातील काही मंडळी राज्य आतून पोखरण्यात मग्न दिसून येत आहेत. मन परिवर्तनाच्या बाबी घडविण्याची गरज नाही. अशाने उलट त्या समाजाची बदनामी होत आहे. आपोआप मन परिवर्तन होणे व चांगला देतू असेल तर विरोध होणार नाही. समाजात ओढून घेवून अन्याय-अत्त्याचार कशासाठी करावयाचे? ठरवुन धोरण कशासाठी राबवयाचे याचा विचार जेष्ठ मंडळींनी केला पाहिजे. या बाबीला समाजातील जेष्ठांनी विरोध केला पाहिजे. जे चुकीचे आहे त्या बाबीला थारा देवू नये काहीच साध्य होत नाही. आंतरधर्मिय विवाह यापुर्वीही झाले आहेत हे नवीन नाही, मात्र सध्याला दबाब व मत व मन परिवर्तन करून फसवणुक होत असेल तर ते योग्य नाही. याची किंमत चुकवावी लागणार आहे. आज मर्यादित आहे ठिक आहे. याचा परिणाम एकाला नाही तर अनेकांना भोगावा लागतो हे लक्षात घेतले पाहिजे. चांगले करण्यासाठी अनेक बाबी आहेत. फसवणुक करणे हे चांगले काम नाही. याबाबत धर्मगुरुंनी समजावुन सांगितले पाहिजे. सर्व समाजात मुले व मुली आहेत. काही समाजात मुलेच आहेत असे नाहीत. इतरही समाजात आजही उच्च शिक्षित मुलींची वाढती संख्या आहे. अशा वाईट कामामुळे समाज बदनाम होतो. विश्वास ठेवला जात नाही. वाईटवेळ येण्याची शक्यता आहे. अजूनही वेळी गेलेली नाही, सुधारणे योग्य आहे. शिक्षण जे अत्याधुनिक आहे, त्याचे ज्ञान द्यावे, धार्मिक शिक्षण देवून किंवा धार्मिकतेच्या आडून वाईट कामे करण्याकडे कल असेल तर ते योग्य नाही. चांगले करण्यासाठी भरपूर असे आहेत. ते करू शकतोत. आजची तरूण मंडळी कितीही फसवणुक करते. किंवा नावे बदलून वावरत असेल तर एक ना एक दिवसा ते उघडे पडतात, त्यानंतर त्यांची स्थिती काय होते. घरदार उद्धस्थ होते. एकाच्या चुकीमुळे घराला शिक्षा भोगावी लागत असेल तर ते काम योग्य नाही. त्यामुळे विचार करून वाईट कामे सोडून दिली पाहिजे. आपले मुले ज्ञानी बनली पाहिजेत. उच्चशिक्षित बनविले पाहिजेत. त्या समाजात उच्च विचाराचे अनेकजन आहेत मात्र थोड्या फार वाईटामुळे तेही बदनाम होत आहेत. मनातून उतरले जात आहेत. याचा विचार केला पाहिजे. देशात काय स्थिती आहे. देशविरोधी काम करणारे कोण सापडत आहेत. सापडल्यावर त्यांची ओळख जाहिर होते. आधार कार्ड असो किंवा अन्य कागदपत्रातून तो अहिंदु आहे असे जाहिर होते त्यावेळी इतर समाजाची त्याकडे पाहाण्याची नजर बदलते हे लक्षात घेवून आगामी वाटचाल करणे हीतावह आहे.

# महिला सक्षमीकरण विकासाच्या दिशेने पुढचे पाऊल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजातील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून मोजतो (I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved) हे जागतिक कीर्तीचे विधान केले होते. २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेत (all India Depressed Classes Women's Conference) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात हे उद्गार काढले होते. आज २०२६ या वर्षातही या क्रांतीकारी वाक्याच्या सत्यतेची आपल्याला पदोपदी अनुभूती येत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय महिलांना शिक्षित होण्याची, आर्थिक संपन्न होण्याची, संघटित होण्याची आणि आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क दिलेला आहे. यामाध्यमातून महिलांनी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, राजकारण आणि उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये आपली छाप उमटवली आहे. महिलांनी विविध क्षेत्रात त्यांच्या कतृत्वाचा ठसा उमटविला आहे.

तरी आजही महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, जसे की लिंगभेद, अत्याचार, बालविवाह, आणि शिक्षणातील असमानता. या समस्यांवर मात करण्यासाठी सरकार, समाज आणि प्रत्येक व्यक्तीने एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांनी आपल्या हक्कांबद्दल जागरूक होणे, आर्थिक स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महिला या समाजात सन्मानाने जीवन जगू शकतात.

ज्या समाजात महिलांना समान हक्क, संधी आणि सन्मान मिळतो तो समाज अधिक विकसित आणि सुसंस्कृत मानला जातो. महिला सक्षम झाली तरच कुटुंब, समाज परिणामी देश अधिक सक्षम होण्यास मदत होते. महाराष्ट्र शासनाने वेळोवळी महिलांसाठी विविध योजना प्रत्यक्ष अंमलात आणून महिला सक्षमीकरणच्या माध्यमातून राज्याच्या विकासासाठी पाऊल टाकले आहे.


नारी शक्ती ही केवळ एक संकल्पना नसून ती समाजाच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. यासाठी शासन मुलींच्या जन्मापासून ते वृध्द /निराधार महिलांच्या मदतीसाठी विविध विभागांमार्फत विविध योजनांची अमंलबजावणी करीत आहे. यामध्ये महिला आणि बालविकास विभागामार्फत महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि बाल कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या जातात. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पात्र महिलांना आर्थिक सहाय्य (मासिक १५००रू.), 'सुकन्या योजना' मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी आणि बालविवाह रोखण्यासाठी या योजनेत मुलींच्या नावे ५० हजार रूपयांची मुदत ठेव (FD) केली जाते., 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS)' या योजनेत ० ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना पोषण आहार, लसीकरण व आरोग्य तपासणी, 'मिशन वात्सल्य' या योजनेत अनाथ बालके, बेघर मुले आणि संकटात सापडलेल्या बालकांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यात येते, आणि 'वन स्टॉप सेंटर' (सखी केंद्र) हिंसाचारग्रस्त महिलांना पोलीस मदत, वैद्यकीय साहाय्य, कायदेशीर सल्ला आणि तात्पुरता निवारा एकाच छताखाली मिळवून देणे. किशोरी शक्ती योजना( किशोरवयीन मुलींचे आरोग्य, पोषण आणि शिक्षणासाठी ), महिला किसान योजना( महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी), महिला आर्थिक विकास महामंडळ (महिलांना स्वयंरोजगारासाठी अनुदान आणि कर्ज सुविधा) यांचा समावेश आहे. या विविध योजनांद्वारे आर्थिक साहाय्य, पोषण, शिक्षण आणि संरक्षण पुरवले जाते.

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहिमेअंतर्गत सुकन्या समृध्दी योजना सुकन्या समृद्धी योजना (SSY) ही भारत सरकारची मुलींच्या शिक्षण आणि लग्नासाठी (शिक्षण व विवाहास मदत) अल्प बचत योजना आहे. मनोधैर्य योजना (अत्याचारित महिला व बालकांना कायदेशीर व आर्थिक मदत). कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाद्वारे महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना आर्थिक पाठबळ देण्यासाठी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप ही महत्त्वपूर्ण योजना राबवली जाते. अशा प्रकारे विविध योजना शासन राबवित आहे.

महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनातील स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, त्यांना स्वतः चे निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. त्यामुळे महिला सक्षमीकरण हे केवळ महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. नारीशक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती आहे. महिलांना सशक्त करणे म्हणजे खऱ्या अर्थाने देशाचा सर्वांगीण विकास करणे होय.

**रेखा पालवे-गायकवाड**
**उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# समतेचे मार्गदर्शक महात्मा बसवेश्वर



भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात सामाजिक परिवर्तनाचे जे दीपस्तंभ उभे राहिले, त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्थान अत्यंत उंच व प्रेरणादायी आहे. बाराव्या शतकातील हा महान समाजसुधारक केवळ धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर परिवर्तन घडवून आणणारा होता. आज साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांची पुनर्स्मृती आणि आजच्या समाजात त्यांची प्रासंगिकता अधोरेखित करण्याची संधी आहे. समता, बंधुता, श्रमाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता आणि अंधश्रद्धाविरोध या मूल्यांचा पाया त्यांनी घातला, जो आजच्या आधुनिक लोकशाही भारताच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे.

महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकात झाला. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यातील विचारशीलता, तर्कशक्ती आणि अन्यायाविरुद्धचा विरोध स्पष्ट दिसून येत होता. त्या काळात भारतीय समाजात जातिव्यवस्था अत्यंत कडवट स्वरूपात अस्तित्वात होती. उच्च-नीचतेच्या भेदामुळे समाजात अन्याय, शोषण आणि असमानता वाढत होती. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या रूढी, परंपरा आणि कर्मकांडांनी सामान्य जनतेचे जीवन अधिकच कठीण केले होते. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी सामाजिक क्रांतीचा ध्यास घेतला आणि समाजाला नव्या विचारांची दिशा दिली.

बसवेश्वरांनी श्रम हाच सर्वोच्च धर्म आहे असे मानले. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वावर आधारित जीवन जगावे, असा संदेश दिला. त्यांच्या या विचारामुळे समाजातील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान प्राप्त झाला. त्या काळात श्रमाला कनिष्ठ मानले जात असताना बसवेश्वरांनी श्रमाचे गौरवगान करून सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. आजच्या काळातही 'डिग्निटी ऑफ लेबर' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते, आणि त्याची मुळे बसवेश्वरांच्या विचारांत दिसून येतात.

बसवेश्वरांनी स्थापना केलेल्या संस्थेच्या मंचावर सर्व जाती-धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर चर्चा करत असत. विशेष म्हणजे या मंचावर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आली होती. त्या काळात स्त्रियांचे स्थान अत्यंत दुय्यम मानले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले. हे त्यांच्या प्रगतिशील आणि लोकशाही विचारांचे द्योतक आहे. संस्थेमध्ये केवळ धार्मिक चर्चा होत नसून सामाजिक समस्यांवरही उपाय शोधले जात होते, ज्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले. बसवेश्वरांनी जातिव्यवस्थेला तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्मावरून नव्हे तर त्याच्या कर्मावरून ठरते. त्यांनी सर्वांना समान मानले आणि समाजात भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांमुळे अनेकांनी जातीभेदाचा त्याग करून समतेच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले, जे त्या काळात अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली, परंतु त्यांनी आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.

स्त्री-पुरुष समानतेबाबत बसवेश्वरांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समान अधिकार देण्यावर भर दिला. त्यांनी स्त्रियांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्या काळात स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या स्थानात सकारात्मक बदल घडून आला.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

बसवेश्वरांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि बाह्य आडंबर यांचा तीव्र निषेध केला. त्यांनी साधेपणावर भर दिला आणि अंतर्मुख भक्तीची संकल्पना मांडली. त्यांच्या वचनांमधून त्यांनी लोकांना सत्य, नैतिकता आणि साधेपणाचा मार्ग दाखवला. त्यांनी देवाची उपासना ही मनापासून करावी, असे सांगितले आणि बाह्य विधींचा त्याग करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विचारांमुळे धर्माचा खरा अर्थ लोकांना समजला. बसवेश्वरांच्या वचनांमध्ये समाजातील वास्तवाचे चित्रण दिसून येते. त्यांच्या वचनांमध्ये जीवनातील अनुभव, तत्त्वज्ञान आणि सामाजिक संदेश यांचा समन्वय आहे. त्यांनी सोप्या भाषेत आणि प्रभावी शैलीत आपले विचार मांडले, ज्यामुळे ते सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले. त्यांच्या वचनांमधून त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञान यावर प्रहार केला आणि लोकांना जागृत केले.

आजच्या काळात बसवेश्वरांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. आधुनिक भारतात जरी संविधानाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांची हमी दिली असली तरी समाजात अजूनही अनेक प्रकारचे भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. जातीयवाद, लिंगभेद, आर्थिक विषमता आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्या अजूनही समाजाला ग्रासून आहेत. अशा परिस्थितीत बसवेश्वरांचे विचार समाजाला योग्य दिशा देऊ शकतात. शिक्षणाच्या क्षेत्रातही बसवेश्वरांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन मानले. आजच्या काळात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. बसवेश्वरांनी दिलेले नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचे शिक्षण आजच्या पिढीला देणे आवश्यक आहे. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

आर्थिक क्षेत्रात बसवेश्वरांनी श्रमाच्या आधारे संपत्ती निर्माण करण्यावर भर दिला. त्यांनी परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले आणि परजीवी वृत्तीचा निषेध केला. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांच्या या विचारांची उपयुक्तता कमी झालेली नाही. स्वावलंबन, कष्ट आणि प्रामाणिकपणा यांवर आधारित अर्थव्यवस्था समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे.

बसवेश्वरांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव पुढील अनेक शतकांपर्यंत दिसून येतो. त्यांच्या विचारांमुळे समाजात समतेची जाणीव निर्माण झाली आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. त्यांच्या कार्याने अनेक समाजसुधारकांना प्रेरणा दिली आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ पुढे नेली.

आज महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांवर आधारित समाजरचना निर्माण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. समाजात बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक असते. बसवेश्वरांनी हेच कार्य केले. त्यांनी लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला नव्या दिशेने नेले. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज आहे, कारण सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आवश्यक आहे.

महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि न्याय यांचा समन्वय आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी आहेत.

अखेरीस असे म्हणता येईल की महात्मा बसवेश्वरांचे कार्य आणि विचार हे भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा अंगीकार केला, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. समतेवर आधारित, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्यासाठी बसवेश्वरांचे विचार मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेऊन आपण एक समताधिष्ठित, मानवतावादी आणि प्रगत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल.

## लातूर बसस्थानकात महिलांची लूटमार वाढली - गांधी चौक पोलीस निरीक्षकांना निलंबीत करा -बालाजी पाटील चाकूरकर



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील बसस्थानक परिसरात दिवसेंदिवस प्रवाशांच्या लूटमारीच्या घटना वाढत असून, पोलीस प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्र्वभूमीवर गांधी चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी पाटील चाकूरकर यांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी मंठाळे नगर येथील शिवकुमार बिराजदार व ज्यांची लूटमार झालेली आहे ते संपूर्ण दोन्ही परिवारातील कुटुंबीय उपस्थित होते.

दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास चाकूर येथील मारुती होणकर हे आपल्या कुटुंबासह बसमध्ये चढत असताना त्यांच्या पिशवीतील सोन्याचे दागिने अज्ञात महिलेने चोरल्याची घटना घडली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.तसेच, दि. १४ एप्रिल रोजी विलास उमाटे यांच्या कुटुंबासोबत प्रवास करत असताना नळेगाव येथे बसमध्ये चढलेल्या महिलांनी त्यांच्या पत्नीची दागिन्यांची बॅग चोरून बावलगाव पाटी येथे उतरल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या बॅगेमध्ये सुमारे २२ तोळे सोन्याचे दागिने असल्याचे सांगितले जाते.

या दोन घटनांवरून लातूर बसस्थानक परिसरात अशा प्रकारच्या गुन्ह्यांची मालिका सुरू असल्याचे स्पष्ट होत असून, यापूर्वीही अनेक प्रवासी लुटले गेल्याच्या तक्रारी आहेत.

पीडितांनी तात्काळ मदतीसाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता गांधी चौक पोलीस स्टेशनकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. संबंधित पोलीस निरीक्षकांना वारंवार फोन करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही, तसेच स्टेशन डायरीवरील कर्मचाऱ्यांनीही दोन तासांपर्यंत दखल घेतली नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते बालाजी पाटील चाकूरकर यांनी या निवेदनात केला आहे.

दरम्यान पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्वतः लक्ष घालून संबंधितांना मदतीचे आदेश दिल्यानंतर रात्री उशिरा एफआयआर दाखल करण्यात आला.

या सर्व प्रकारामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून

या संदर्भात बालाजी पाटील चाकूरकर यांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

## बामणी येथील जळीतग्रस्त कुटुंबीयास आ. कराड यांच्याकडून मदतीचा हात




**लातूर/प्रतिनिधी :** पोटाची खळगी भरण्यासाठी झाडू तयार करून विक्री करणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील श्रीहरी कांबळे यांच्या घरास मध्यरात्री अचानकपणे आग लागून झालेल्या दुर्घटनेत संपूर्ण संसार जळून खाक झाला. संपूर्ण कुटुंब उघड्यावर आल्याने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी सदरील कुटुंबीयास तातडीने संसार उपयोगी साहित्यासह इतर मदत करून दिलासा दिला आहे.

गेल्या दोन पिढ्यापासून झाडू तयार करून विक्री करणे त्यातून मिळालेल्या चार पैशात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील सत्तर वर्ष वयाचे श्रीहरी लालबा कांबळे यांच्यासह कुटुंबात सहाजण असून हे सर्वजण झाडू बनवण्याचा व्यवसाय करतात गेल्या दोन पिढ्यापासून या व्यवसायावर हे कुटुंब अत्यंत आनंदी आणि सुखी जीवन जगत होते.

गेल्या १५ एप्रिल २०२६ रोजीच्या मध्यरात्री अचानकपणे शॉर्ट सर्किट होऊन झाडू बनविण्याच्या कच्च्या मालाला आग लागून झाडूच्या कच्च्या मालासह घरातील सर्व कपडे, अन्नधान्य संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले. यात दोन अडीच लाखाचे नुकसान होऊन काही क्षणातच हे संपूर्ण कांबळे कुटुंबीय उघड्यावर आले.

सदरील घटनेची माहिती समजतात भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी श्रीहरी कांबळे आणि त्यांच्या कुटुंबातील मालनबाई कांबळे, लक्ष्मण कांबळे, गजानन कांबळे, राम कांबळे, सीता कांबळे, कल्याण कांबळे या सर्वांना दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून, पांघरून, संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडी, किराणा साहित्य यासह सर्व प्रकारची तातडीची मदत त्याचबरोबर जळीतग्रस्त कांबळे कुटुंबीयास तात्काळ शासनाची घरकुल योजना मंजूर करून देण्यात यावी अशी सूचना तहसिलदार सौदागर तांदळे यांना केली.

याप्रसंगी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, प्रताप पाटील, सुरज शिंदे, गोविंद नरहरी विजयकुमार मलवाडे, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, ज्ञानोबा शेळके, मारुती शिंदे, आदिनाथ मुळे, सतीश बिराजदार, रुपेश काळे सुरेखा पुरी, सचिन साबदे, सुरेश पाटील यांच्यासह अनेक जण होते.

# आजारपणातील दिलासा...

थकलेली माणसे : विजय तरवडे

माझे वय ७२ वर्षे आहे. माझ्या पिढीतल्या अनेकांबाबत असे आढळले आहे की तरुण असताना त्यांनी मेडिक्लेम किंवा आरोग्य विमापॉलिसी काढलीच नाही. काहींनी काढली; पण नंतर बंद केली. या संदर्भात एक युक्तिवाद हमखास ऐकू येतो. तो म्हणजे, आपण आजारी पडलो नाही तर, आपले पैसे बुडतात! आरोग्यविम्याची संकल्पना समजून घेतली तर, हा गैरसमज दूर होईल. आरोग्यविमा पॉलिसी काढणारे सर्वजण विमाहप्ता भरतात. त्यातले काहीजण आजारी पडतात, सर्वांनी भरलेल्या विमा हप्त्याच्या रकमेतून विमा कंपनीचा प्रशासकीय खर्च वजा जाऊन उरलेल्या रकमेतून विमा कंपनी आजारी पडलेल्या विमेदाराला पैसे देते. म्हणजेच, आपण ज्या वर्षी आजारी पडत नाही, त्या वर्षी आपण भरलेल्या हप्त्यातून कुठेतरी एखादा आजारी पडलेला विमेदार बरा व्हायला हातभार लागत असतो. ते असो.

तूर्त अशी स्थिती आहे की, ७० वर्षे आणि अधिक वय झालेल्या व्यक्तीला आरोग्यविमा मिळणे जिकीरीचे झाले आहे. शिवाय या वयात विमा मिळाला तरी, त्याचा हप्ता प्रचंड असतो.



त्यामुळे आरोग्यविमा नसलेल्या ७० वर्षांवरील व्यक्तींसाठी भारत सरकारच्या 'भारत प्रधानमंत्री जनआरोग्य' योजनेमार्फत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'वय वंदना कार्ड' योजनेबद्दलची काही माहिती इथे देत आहे. सत्तर वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या सर्वांना हे कार्ड मिळू शकते.

हे कार्ड मोफत आहे. या कार्डावर ५ लाखांपर्यंत मोफत उपचार मिळतात.

आयुष्मान कार्डाव्यतिरिक्त ही मदत असू शकेल.

हे कार्ड काढण्यासाठी उत्पन्नाची अट नाही.

आधार कार्ड आणि ई-केवायसी वापरून हे कार्ड बनवता येते. कार्ड बनवताना आधार कार्डावरील जन्मतारीख ग्राह्य धरली जाईल.

मोबाईल किंवा इंटरनेट वापरण्याचा सराव/माहिती नसेल, त्यांनी कार्ड बनवताना घरातील तरुण सदस्य, किंवा परिचित व्यक्तीची मदत घ्यावी.

महत्त्वाच्या सूचना- वर्तमानपत्रात किंवा आंतरजालावर (इंटरनेट) आलेली माहिती वर दिली आहे. आता याबाबत आणखीन काही सूचना मी सांगतो.

तुम्ही ज्या शहरात राहता तिथल्या कोणकोणत्या सरकारी आणि खासगी रुग्णालयात हे कार्ड चालते, याची चौकशी करून घ्या. त्यातील कोणती रुग्णालये तुमच्या घरापासून जवळ आहेत, हे पाहा. जवळ असलेल्या रुग्णालयांमध्ये असलेल्या गर्दीचा अंदाज घ्या.प्रत्येक रुग्णालयात प्रत्येक आजारा-वर उपचारांची सोय असतेच असे नाही. तुम्हाला स्वतःसाठी ज्या आजारांची शक्यता वाटते/ज्या आजारांसाठी उपचार लागू शकतील त्यावर उपचार करणारे सोयीस्कर रुग्णालय कोणते ते पाहून ठेवा.

या वयात आपल्याला अनेक तपासण्या नियमित कराव्या लागतात. उदाहरणार्थ रक्तशर्करा, इसीजी, वगैरे. आपण आपले सोयीस्कर रुग्णालय निश्चित केले की, इतर प्रासंगिक तपासण्या तिथेच करीत जा. त्या निमित्ताने त्या रुग्णालयातील तांत्रिक कार्यपद्धती, ओपीडीच्या वेळा, आपल्याला अभिप्रेत असलेल्या आजारांसाठी असलेले डॉक्टर्स कोणत्या वारी किती वाजता येतात, जनरल वॉर्डमधल्या बेड्सची संख्या, सेवकवर्ग, गर्दीच्या वेळा वगैरेशी जुळवून घेणे सोपे जाईल. शक्य असेल तर, तिथल्या कर्मचार्यांशी परिचय करून घ्या. आयत्या वेळी रुग्णालयात दाखल होण्याचा प्रसंग आला तर, तिथल्या तांत्रिक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडणे सुलभ जाईल.

शेवटची महत्त्वाची सूचना- या कार्डावर कॅशलेस उपचार मिळतील असे सरकारने म्हटले आहे; पण ही अगदी नवी-नवी योजना आहे. सरकारने यासाठी नेमकी किती तरतूद केली आहे, ती विविध शहरांमधल्या विविध रुग्णालयांपर्यंत कशी पोचणार आहे, हे आपल्याला ठाऊक नाही. शिवाय, अनेकदा रुग्णालय आणि सरकारी खाते यांच्यात नेमका संपर्क कमी असू शकतो, सरकारकडून निधी यायला विलंब होऊ शकतो.

इतर कोणत्याही अनपेक्षित अडचणी येऊ शकतात. हे सगळे गृहीत धरून उपचारांसाठी काही रक्कम जवळ ठेवा. समजा तुम्ही रुग्णालयात दाखल झालात आणि कॅशलेस रकमेची मंजुरी यायला काही तास, काही दिवस उशीर झाला तर, पैशांवाचून उपचार अडू नयेत. अशीच वेळ आली तर, तात्पुरती आपल्याजवळची रक्कम भरून नंतर तिचा परतावा मागावा. कारण, सर्वात आधी

# उन्हाळ्यात जास्त पाणी पिणे हे धोक्याचे लक्षण आहे, दुष्परिणाम जाणून घ्या

कडक उन्हात शरीरात पाण्याची पातळी योग्य राखणे आरोग्यासाठी आवश्यक मानले जाते. आरोग्य तज्ञ अनेकदा दिवसातून ८-१० ग्लास पाणी पिण्याची शिफारस करतात, पण तुम्हाला माहित आहे का की गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे शरीरासाठी हानिकारक ठरू शकते? वैद्यकीय शास्त्रात याला 'ओव्हरहायड्रेशन' किंवा 'वॉटर टॉक्सिसिटी' (जलविषबाधा) म्हणतात. या स्थितीमुळे शरीराचे अंतर्गत संतुलन बिघडू शकते आणि गंभीर आजार उद्भवू शकतात.

जेव्हा पाण्याची समस्या निर्माण होते

जेव्हा आपण शरीराला आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी पितो, तेव्हा रक्तातील सोडियमची पातळी झपाट्याने कमी होते. या स्थितीला हायपोनेट्रेमिया म्हणतात. सोडियमच्या कमतरतेमुळे शरीरा-तील पेशींना सूज येते, ज्याचा मेंदूवर नकारात्मक परिणाम होतो. जास्त पाणी प्यायल्याने मूत्रपिंडांवर अतिरिक्त ताण येतो, ज्यामुळे थकवा, डोकेदुखी, मळमळ आणि गोंधळ होऊ शकतो.



वारंवार तहान लागणे

भरपूर पाणी प्यायल्यानंतरही तुमचा घसा कोरडा पडत असेल, तर याकडे केवळ उष्णतेचा परिणाम म्हणून दुर्लक्ष करू नका. हे काही गंभीर आरोग्य समस्यांचे लक्षण असू शकते.

लोहाच्या कमतरतेमुळे निमिया होतो . जेव्हा हिमोग्लोबिनची पातळी कमी असते, तेव्हा अवयवांपर्यंत ऑक्सिजन पोहोचवण्यासाठी हृदयाला जास्त मेहनत करावी लागते, ज्यामुळे शरीरातील पाणी कमी होते आणि वारंवार तहान लागते.

तोंड कोरडे पडणे

कधीकधी समस्या तहानची नसते, तर तोंड कोरडे पडण्याची असते. जेव्हा तोंडातील लाळ ग्रंथी पुरेशी लाळ तयार करत नाहीत, तेव्हा घसा आणि तोंड सतत कोरडे वाटते. लाळ केवळ अन्न पचनास मदत करत नाही, तर तोंडातील संसर्ग देखील टाळते.

डिहायड्रेशन टाळण्यासाठी हे ५ घर-गुती उपाय ठरतील फायदेशीर

हे आजार देखील एक लक्षण असू शकतात

अति तहान लागणे हे मधुमेहाचे प्रारंभिक लक्षण असू शकते. याव्यतिरिक्त, अतिसार किंवा औषधांच्या दुष्परिणामांसारख्या पोटाच्या समस्यांमुळे देखील शरीरातील द्रवपदार्थ वेगाने कमी होऊ शकतात, ज्यामुळे तहान लागण्याची प्रक्रिया सुरू होते.

# फक्त लक्ष आता विधानपरिषद

महाविकास आघाडीला एकाच जागेची खात्री असल्याने व या जागेसाठी उद्धव ठाकरे यांच्या ना-वाची चर्चा असल्याने काँग्रेसची भूमिका काय असेल ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल. ठाकरे यांना राष्ट्रवादी (शरद पवार) गटाने आधीच पाठिंबा जाहीर केला आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेत रिकाम्या झालेल्या नियमित ९ जागांसाठी आणि १ पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या दहा जागांच्या निवडणुकीचे मतदान येत्या १२ मे रोजी होणार आहे. निवडणूक जाहीर होताच महायुतीमधल्या तिन्ही पक्षातल्या इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. महाविकास आघाडीला विधानसभेतील संख्याबळानुसार एकाच जागेची खात्री असल्याने त्या जागेवर कोणाची वर्णी लागणार याविषयी उत्सुकता आहे. ज्या जागेची पोटनिवडणूक जाहीर झाली, ती विधान परिषदेचा राजीनामा देऊन काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांची होती. त्यामुळे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आतापासूनच या जागेवर दावा केला आहे. ही जागा आमची होती म्हणून ती आम्हाला मिळायला हवी, असे त्यांनी म्हटले आहे. ज्या ९ नियमित जागांसाठी निवडणूक होणार आहे त्याचा विचार करता विधानसभेतील पक्षनिहाय संख्याबळानुसार भाजपचे पाच, शिंदे यांच्या शिव-सेनेचे दोन, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा एक असे महायुतीचे आठ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. या नऊ जागांसाठी २९ मतांचा कोटा, तर प्रज्ञा सातव यांच्या जागेसाठी १४४ मतांचा कोटा ठरवण्यात आला आहे. महायुतीचे बहुमत लक्षात घेता या पोटनिवडणुकीतही त्यांचा उमेदवार विजयी होऊ शकतो. महायुतीचे ८-९ उमेदवार विजयी होणार याची शाश्वती असली तरी उमेदवारीसाठी रस्सीखेच होणार यात शंका नाही. उद्धव ठाकरे (महाविकास आघाडी), नीलम गोर्हे, शिंदे शिवसेना, शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी शरद पवार गट), अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर (भाजप) हे आमदार पुन्हा विधान परिषदेवर येण्यासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे महायुतीच्या तिन्ही पक्षांत उमेदवारीसाठी रस्सीखेच होणार हे उघड आहे. याआधी राज्यसभेवर शरद पवार यांच्या उमेदवारीला शिवसेना ठाकरे गटाने



पाठिंबा दिला तेव्हा पवार यांनी विधान परिषदेसाठी उद्धव ठाकरे किंवा ते सुचवतील त्या उमेदवाराला राष्ट्रवादी (शरद पवार गट) पाठिंबा देईल अशी भूमिका घेतली आहे; मात्र काँग्रेस ठाकरे यांना पाठिंबा देणार की, स्वतःचा उमेदवार उभा करणार हे येत्या काही दिवसांत समजेल.

राजकीय ओढाताण

या परिस्थितीत काँग्रेसची भूमिका काहीशी सावध; पण सहकार्याची असू शकते. ठाकरे आणि शरद पवार गटाच्या सदस्यांमधून उद्धव ठाकरे मताचा कोटा पूर्ण करू शकतात.

महाविकास आघाडीच्या उर्वरीत आमदारात काँग्रेसचे संख्याबळ लक्षणीय आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या काँग्रेसचा त्यावर दावा असू शकतो. याआधी राज्यसभेच्या निवडणुकीतही पवार यांना पाठिंबा देऊन काँग्रेसने त्यागाची भूमिका घेतली होतीच. आताही तशीच लवचिक भूमिका काँग्रेसला घ्यावी लागेल. अन्यथा काँग्रेसने देखील आपला उमेदवार लादला, तर महाविकास आघाडीतच मतांची फाटाफूट होऊन ती एकमेव जागाही हरण्याची नामुष्की येऊ शकते. सध्याची स्थिती पाहता शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यामागे खंबीरपणे उभे राहतील, काँग्रेसही महाविकास आघाडी अभेद्य राहण्यासाठी ठाकरे यांनाच पाठिंबा देईल अशीच शक्यता दिसते. महायुतीला ९ जागा अपेक्षित असल्या तरी त्यातील मित्र पक्षांनाही जागा वाटपाचे सूत्र ठरवावे लागणार आहे. साहजिकच अनेक इच्छुकांच्या महत्त्वाकांक्षांनाही मुरड घालावी लागणार आहे. भाजप विधान परिषदेतील उमेदवारी निश्चित करताना अलीकडेच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील नेत्यांच्या कामगिरीचा आणि त्यांच्या निष्ठेचा विचार करील असे दिसते.

अन्यथा पक्षात बाहेरून आलेल्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने उमेदवारी दिली गेल्यास पक्षात नाराजी वाढू शकते. शिवसेना शिंदे गट नीलम गोर्हे यांना पुन्हा उमेदवार देणार, की नवा उमेदवार पाठवणार हेही पाहावे लागेल. जागा वाटपावरून उघड संघर्ष टाळण्यासाठी महायुती आणि मविआचे वरिष्ठ नेते घटक पक्षात समन्वय साधण्याचा प्रयत्न करतील; मात्र प्रत्येक पक्षाला आपल्या नेत्यांचे पुनर्वसन करायचे असल्याने पडद्यामागे राजकीय ओढाताणही पाहायला मिळेल हे निश्चित.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**वैवाहिक जीवनाच्या सुखाचा उपभोग घेत असताना** ....आपल्या दे-शात सेक्सवर बोलणं एक वाईट गोष्ट काहींच्या मते मानली जाते, पण एका संशोधनानुसार सेक्स आयुष्यात महत्वाचा आहे, त्यामुळे तुम्हाला



चांगलं आरोग्य देखील लाभतं, ब्लड प्रेशरमध्ये सुधार होतो, कोलेस्ट्रॉल सुधारण्यास मदत होते, सर्वेनुसार सेक्समुळे हार्टअटॅकची शंका कमी होते. २) चांगला सेक्स केल्याने ताण तणाव कमी होतो. नियमित सेक्स करणारी माणसं कमी आजारी पडतात. **क्रमशः**

## २ Joke विनोद




सोनू : अरे गधड्या ते दराडेखोर आले. त्यांनी घर लुटुन नेले मग त्यावेळेस तू घरात बसून काय करत होतास? तुझ्याजवळ पिस्तूल दिले होते. ते पिस्तूल कशासाठी होते? तू काय केलेस त्या पिस्तूलाचे?

मोनू: तो मी लपवून ठेवले होते. त्यामुळे दरोडेखोरांना नेतांच आले नाही.

## ३ Message संदेश



Chicken ready? Yes boss
Fish ready? Yes boss
Amlet ready? Yes boss
Mutton ready? Nahi boss
Bakra abhi sms padh raha hai!!!

## ४ Thought सुविचार




काजव्याला वाटते जग आपल्याच लुकलुकण्यामुळे उजळले आहे.
-अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**आयुर्धृतं, नदी पुण्यं, भयं चोरः सुखंप्रिया।**
**वैरं द्यूतं, गुरूर्ज्ञानं, श्रेयो सज्जनपूजनम्।।**

अर्थ : तूप आयुष्य वाढविते, नदी पुण्य देते, चोर भय देतो, प्रेमिका सुख देते, जुगार शत्रू देतो, गुरू ज्ञान देतो आणि सज्जनाची पूजा उत्तम फळ देणारी असते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. मिठाई तयार करणारा
३. ज्वारीची वाळलेली ताटे, गाय-बैलाचे खाद्य, ५. सवाद्य, गाजावाजा करीत
९. सुमारे दोन मैल
११. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
१३. तंबूवजा घर
१४. रसपूर्ण, रसाळ
१७. लोकनाट्यातील कलाकार
१९. हिंदीत प्रवास
२१. दरवाजा
२२. पाताळ
२४. बोकड
२६. कोवळी फांदी
२७. हिमालय सर करणारा शेर्पा
२८. द्रव्य, किंमत
३०. न्हाव्याची हत्याराची पिशवी, पडशी
३२. युद्धातील वीरश्रींची घोषणा
३५. समुद्राच्या लाटांचा आवाज
३६. गीत गाणे
३७. धातुचा धागा
३८. व्यापारातील नुकसान, फटका, हादरा
३९. मोठी टोपली, फलक
४१. आयुष्य
४३. घर
४५. ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड
४८. कडक व चिवट
४९. एकाक्षरी प्रश्न
५१. अघळपघळ, स्वैर
५३. हिस्सा
५४. संथपणे
५५. माफी
५६. संतोष, आनंद
५७. प्रतिबिंब दाखविणारी काच
५८. अंगावरील बारीक केस
६०. केस काळे करण्याचे साधन
६१. आवर घालणारी वादी
६२. सैल झालेले (वस्त्र)
६४. आश्चर्याने थक्क होणे
६७. लक्ष्मीपती
६८. सन्मानाची रक्कम
७०. चांदणी
७२. धमनी
७४. गप्प बसणे
७६. इमारतीतील घर, फ्लॅटला मराठी शब्द
७८. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्राव
७९. दागदागिने
८०. रडया मनुष्य

### उभे शब्द

१. सहस्रवेळा
२. चणचण
४. लहान मुलांची गाणी
५. भांडणे, चर्चा
६. शोध
७. गालाची बाजू
८. तात्पर्य, अर्थ, सार
१०. सदोदित
१२. आठवाड्याचा दिवस
१५. अखेरीस,१६. विष्णूचा एक अवतार
१८. श्रीमंत
२०. विहीरीतून पाणी काढण्याचे यंत्र
२३. समुद्र
२४. तोंड खाली घातलेला
२५. सततचे नामस्मरण
२९. प्रेम, माया
३१. समीक्षक
३३. सीमा
३४. जयपराजय
३६. कपाळ फुटणे
४०. हिंमत
४२. समुद्रातील अग्नी
४४. निराश
४५. फुलेफळे यांचे शेत
४६. युद्ध
४७. प्रेम, माया, लाड
४८. पुष्कळ
५०. भर दिवसा
५२. जास्तीत जास्त व कमीत कमी
५४. तात्पर्य
५६. अखंडीतपणा
५७. आंब्यातील द्रव
५९. देश, जमीन
६३. फळातील मगज
६५. अवधान, लक्ष
६६. ठेकेदार
६९. टक्कर
७१. फळातील द्रव
७२. होकारच्या विरुद्ध
७३. सहाय्य
७४. मजा, गंमत
७५. मेहरबानी
७७. मेहरबानी
७७. दुःख, खेद, सल
७८. लुसलुशीत

### आडवे उत्तरे

१.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रक्कमपात ८०.रडतराऊत

### उभे उत्तरे

१.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अध-ोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ




## थोडक्यात/ संक्षिप्त

### वानखेडे स्टेडियमवर जसप्रीत बुमराहचे रौद्र रूप

**विकेट न मिळाल्याने केली फेकाफेक**

मुंबई–इंडियन प्रीमियर लीगचा सर्वात यशस्वी संघ असलेला मुंबई इंडियन्स सध्या स्पर्धेत विजयासाठी स्ट्रगल करताना दिसतोय. सुरुवातीला एक सामना जिंकल्यावर अद्याप मागील ४ सामन्यात मुंबई इंडियन्सला विजय मिळवणं शक्य झालेलं नाही. अशातच मुंबई इंडियन्सचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह याला विकेट घेण्यात अपयश येतंय. मुंबई विरुद्ध पंजाब सामन्या दरम्यान जसप्रीत बुमराह आणि कर्णधार हार्दिक पंड्या यांच्यात मैदानात वाद झालेला दिसला. शिवाय आरसीबी विरुद्ध झालेल्या सामन्यात सुद्धा नेहमी मैदानात शांत राहणाऱ्या बुमराहचा रुद्रावतार पाहायला मिळाला. सध्या हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय.
मैदानावर दिसला बुमराहचा राग :मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आरसीबी विरुद्ध मुंबई इंडियन्स यांच्यात सामना झाला.

### डीसी विरुद्ध मैदानात उतरताच आरसीबी ने केला नवा विक्रम

बंगळुरु–गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगामात आतापर्यंत उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून, त्यांनी पाचपैकी चार सामने जिंकले आहेत. आरसीबी या हंगामातील आपला सहावा सामना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध खेळत आहे आणि आयपीएलच्या इतिहासात इतर कोणत्याही संघानं न साधलेला एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आता आयपीएलच्या इतिहासात एकाच मैदानावर १०० सामने खेळणारा पहिला संघ ठरला आहे.
आरसीबीचा बंगळुरुमध्ये १००वा आयपीएल सामना : आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचे घरचे मैदान एम. चिन्नास्वामी स्टेडियम आहे, जिथे त्यांनी पहिल्या हंगामापासून आपले घरचे सामने खेळले आहेत. जेव्हा आयपीएल २०२६ मध्ये आरसीबीने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध सामना खेळला, तेव्हा तो बंगळुरुमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवरील त्यांचा १००वा सामना होता. यासह, आरसीबी आयपीएलमध्ये हा पराक्रम करणारा पहिला संघ ठरला.

### पाकच्या नव्या कसोटी कोचची घोषणा, निवृत्ती घेतलेल्या खेळाडूवर दिली मोठी जबाबदारी

नवी दिल्ली–पाकिस्तानने मे महिन्यात बांगलादेशविरुद्ध होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी नवीन प्रशिक्षक मंडळाची घोषणा केली आहे. माजी कर्णधार सरफराज अहमद याची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सरफराज गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला. माजी कसोटी फलंदाज असद शफीक याची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून, तर माजी वेगवान गोलंदाज उमर गुल याची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.नव्या कोचिंग स्टाफअंतर्गत पाकिस्तान संघाचा कर्णधार शान मसूद कायम असणार आहे. सरफराज अहमदने २०१७ ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या पाकिस्तान संघाचे नेतृत्व केले होते. अलीकडेच त्याने इंग्लंड लायन्सविरुद्ध पाकिस्तान शाहीन संघाचं मार्गदर्शकव्यवस्थापक म्हणून काम पाहिलं.

### आरसीबी च्या धुरंदरवर पडली भारी, पांड्याला जमलेही नाही ते पटेलने करून दाखवले!

बंगळुरू–आयपीएल २०२६ मध्ये रविवारच्या पहिल्या सामन्यात आरसीबीने २० ओव्हरमध्ये ८ विकेट गमावून १७५ रन केल्या आहेत. बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममधली खेळपट्टी बॅटिंगसाठी अनुकूल असतानाही दिल्ली कॅपिटल्सच्या बॉलरनी आरसीबीला एवढ्या कमी स्कोअरवर रोखले. लुंगी एनगिडी, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी २–२ विकेट मिळाल्या, तर मुकेश कुमारने एक विकेट घेतली.आरसीबीकडून फिल सॉल्टने ३८ बॉलमध्ये ६३ रन केले, ज्यात ३ सिक्स आणि ४ फोरचा समावेश होता. याशिवाय टीम डेव्हिडने २६ रन, विराट कोहलीने १९, देवदत्त पडिक्कलने १८, जितेश शर्माने १८ आणि कृणाल पांड्याने १२ रनची खेळी केली. आरसीबीला फक्त १७५ रनवर रोखण्यात दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल याची कॅप्टन्सीही तितकीच महत्त्वाची ठरली.

## स्मृती मानधना टी–२० मध्ये सर्वाधिक धावा करणारी भारतीय



मुंबई : भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिकी महिला संघ यांच्यातील पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेतील पहिला सामना डर्बन येथे खेळला गेला, ज्यात भारतीय संघाला सहा गडी राखून पराभव पत्करावा लागला. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतासाठी शेफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी डावाची सुरुवात केली आणि पाच षटकांत पहिल्या विकेटसाठी ४६ धावा जोडल्या. वर्मा २० चेंडूंमध्ये पाच चौकार आणि एका षटकारासह ३४ धावा करून बाद झाली. भारतासाठी डावाची सुरुवात करणाऱ्या स्मृती मानधनाला या सामन्यात मोठी खेळी करता आली नाही आणि ती केवळ १३ धावाच करू शकली. पण, या छोट्याशा खेळीदरम्यान तिने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला.

**गुजरातचा कोलकातावर पाच गडी राखून विजय** अहमदाबाद : गुजरात टायटन्सने कोलकाता नाईट रायडर्सचा पाच गडी राखून पराभव केला. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात,
...रोहित शर्माला मागे टाकत मानधना आता टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताची सर्वाधिक धावा करणारी क्रिकेटपटू बनली आहे. मानधनाच्या नावावर आता ४,२४४ धावा आहेत, तर रोहितने ४,२३१ धावा केल्या आहेत. विराट कोहली आता ४,१८८ धावांसह या यादीत तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर ३,८६९ धावांसह चौथ्या स्थानावर आहे. सूर्यकुमार यादव ३,२७२ धावांसह पाचव्या स्थानावर आहे.
मुंबई क्रिकेट संघाचा ऐतिहासिक निर्णय; मुंबईचे खेळाडू होणार मालामाल, मिळणार लाखोंचा पगार
याव्यतिरिक्त, मानधना आता बाबर आझमच्या विश्वविक्रमाच्या जवळ पोहोचत आहे. बाबरने टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४,५९६ धावा केल्या आहेत आणि मंधाना त्याच्यापेक्षा फक्त ३५२ धावांनी मागे आहे. जर तिचा फॉर्म असाच टिकून राहिला, तर येत्या सामन्यांमध्ये हा विक्रम मोडला जाऊ शकतो.केवळ महिला क्रिकेटचा विचार केल्यास, मानधना सध्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. तिच्या पुढे न्यूझीलंडची दिग्गज सुझी बेट्स आहे, जिच्या नावावर ४,७१७ धावा आहेत. मंधानाकडे तिला मागे टाकण्याची चांगली संधी आहे.दरम्यान, दक्षिण आफ्रिकेने १९.१ षटकांत ४ गडी गमावून १५८ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. डावाची सुरुवात करताना, कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने ३९ चेंडूंमध्ये ८ चौकारांसह ५१ धावा केल्या. अनेरी डर्कसन ३४ चेंडूंमध्ये ४४ धावांवर नाबाद राहिली. या दोघींनी तिसऱ्या विकेटसाठी ५२ धावांची भागीदारी केली. कोल ट्रायन १६ चेंडूंमध्ये १८ धावांवर नाबाद राहिली. भारताकडून श्रेयंका पाटीलने ४ षटकांत २६ धावा देऊन २ बळी घेतले. अरुंधती रेड्डी आणि श्री चरानी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.या विजयासह दक्षिण आफ्रिकेने मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. दुसरा सामना रविवारी त्याच मैदानावर खेळला जाणार आहे.

## मलिंगा–हिंगे–रेड्डी त्रिकुटाने हैदराबादला मिळवून दिला संस्मरणीय विजय!



आयपीएल २०२६ मधील २७ व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्जवर विजय मिळवला आहे. हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर १९५ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ अपयशी ठरला. अटीतटीच्या लढतीत हैदराबादने या स्पर्धेतील तिसऱ्या विजयाची नोंद केली असून, चेन्नईच्या फलंदाजांना मोक्याच्या क्षणी धावा करता आल्या नाहीत.
आयपीएल २०२६ स्पर्धेतील २७ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात हैदराबादने पहिल्या डावात फलंदाजी करताना ९ गडी बाद १९४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला सुरुवात तर चांगली मिळाली होती. पण हवा तसा शेवट करता आला नाही. चेन्नईचा संघ विजयापासून १० धावा दूर राहिला. यासह हैदराबादने या स्पर्धेतील तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे.
चेन्नईला हा सामना जिंकण्यासाठी १९५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्ज संघाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. संजू सॅमसन ७ धावांवर माघारी परतला. त्यामुळे ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रेवर जबाबदारी होती. दोघांनी मिळून अर्धशतकी भागीदारी केली. ऋतुराजने १९ धावा केल्या. तर आयुष म्हात्रेने ३० धावांचे योगदान दिले. त्यानंतर मॅथ्यू शॉर्टने एकेरी दुहेरी धाव घेऊन डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तो देखील ३० धावा करून माघारी परतला. सर्फराज खानने २५ धावांचे योगदान दिले. डेवाल्ड ब्रेव्हिस शून्यावर माघारी परतला. शिवम दुबे २१ धावा करून माघारी परतला. त्यानंतर शेवटी अंशूल कंबोज आणि ओव्हरटनने विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण हैदराबादने हा सामना १० धावांनी आपल्या नावावर केला. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या हैदराबादकडून अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड या जोडीने दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पावरप्लेमध्ये ७५ धावा जोडल्या.

## दोघांना पैसे द्या आणि घरी पाठवा! माजी क्रिकेटपटू संतापले

आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्सची खराब कामगिरी सुरूच असून पंजाब किंग्जविरुद्ध झालेल्या पराभवानंतर माजी क्रिकेटपटू के. श्रीकांत यांनी कर्णधार हार्दिक पंड्या आणि गोलंदाजांवर कडक टीका केली आहे. श्रीकांत यांनी दीपक चहर आणि शार्दुल ठाकूर यांच्या महागड्या गोलंदाजीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, त्यांना संघातून डच्चू देण्याचा खळबळजनक सल्ला दिला आहे.
आयपीएल २०२६ स्पर्धेत मुंबई इंडियन्सला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. पहिल्या सामन्यात मुंबईने कोलकाता नाईट रायडर्सवर विजय मिळवला होता. त्यानंतर पुढील सर्व सामन्यांमध्ये मुंबईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. ५ वेळचा चॅम्पियन मुंबई इंडियन्स संघ एक विजयासाठी संघर्ष करताना दिसून येत आहे. त्यामुळे कर्णधार हार्दिक पंड्या आणि संपूर्ण संघावर जोरदार टीका होत आहे. दरम्यान माजी भारतीय क्रिकेटपटू के श्रीकांत यांनी देखील मुंबई इंडियन्सवर जोरदार टीका केली आहे. यासह एक सल्ला देखील दिला आहे.मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने १९५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पंजाब किंग्जने सहज विजय मिळवला.
या सामन्यानंतर आपल्या युट्यूब चॅनलवर बोलताना के श्रीकांत म्हणाले, ङ्गमला एक कळत नाही, मुंबई इंडियन्स दीपक चहरला प्लेईंग ११ मध्ये स्थान का देत आहे? त्याला रिटेन तरी का केलं? पहिल्या षटकात गोलंदाजी करताना त्याने २१ धावा खर्च केल्या. गेल्या सामन्यात २२ धावा खर्च केल्या. २.३ षटकात ४५ धावा खर्च केल्या. सर शार्दुल ठाकूरने ३ षटकात ४२ धावा खर्च केल्या. दोघांनी ५.३ षटक गोलंदाजी केली आणि ८७ धावा खर्च केल्या.ङ्घ

## २४ तासात दुपटीने वाढली हैदराबादची ताकद!

### पॅट कमिन्सचं भारतात लँडिंग

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये आज डबल हेडल सामना खेळवला जाणार आहे. सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल. या महत्त्वाच्या लढतीपूर्वी हैदराबादच्या संघाला २४ तासात दोन गुड न्यूज मिळाल्या आहेत. हैदराबादचा कॅप्टन पॅट कमिन्स हा भारतात पोहोचला असून तो लवकरच स्कॉड जॉईंड करेल. तर पॅट कमिन्स हैद राबादमध्ये पाऊल ठेवताच काव्या मारनने मोठा निर्णय घेतला आहे.
हैदराबादमधील दोन युवा भारतीय बॉलर्सने कहर केला असताना आता हैदराबादने एका साऊथ अफ्रिकन प्लेयरला साईन केलं आहे. हैदराबाद संघात एक मोठा बदल करण्यात आला असून दक्षिण आफ्रिकेचा वेगवान एक्सप्रेस गेराल्ड कोएत्जी आता 'ऑरेंज आर्मी'चा भाग झाला आहे. हैदराबादने दुखापतग्रस्त डेव्हिड पायनेच्या जागी कोएत्जीचा संघात समावेश केला आहे. डेव्हिड पायनेने या सीझनमध्ये हैदराबादसाठी २ मॅच खेळले होते, ज्यामध्ये त्याने २ विकेट्स घेतल्या. मात्र, घोट्याच्या दुखापतीमुळे त्याला उर्वरित स्पर्धेतून बाहेर व्हावं लागलं आहे.
दक्षिण आफ्रिकेसाठी तिन्ही फॉरमॅट खेळणाऱ्या गेराल्ड कोएत्जीला हैदराबादने २ कोटी रुपयांच्या किमतीत आपल्या ताफ्यात सामील करून घेतले आहे. कोएत्जीच्या आंतरराष्ट्रीय करिअरवर नजर टाकली तर, त्याने आतापर्यंत ४ टेस्टमध्ये १४ विकेट्स, १४ वनडेमध्ये ३१ विकेट्स आणि १८ टी–२० इंटरनॅशनलमध्ये २२ विकेट्स घेतल्या आहेत. यापूर्वी तो मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्ससोबत संघासोबत खेळलाय.

## स्मृती मंधानाने हिटमॅनचा रेकॉर्ड मोडत रचला इतिहास; तरीही भारताचा पहिल्या सामन्यात पराभव

**डरबन**–भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमधील टी–२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिला सामना डरबन येथील किंग्समीड स्टेडियमवर खेळला गेला, जो दक्षिण आफ्रिकेनं ६ गडी राखून जिंकला. या सामन्यात स्मृती मंधाना अवघ्या १३ धावांवर बाद झाली, मात्र तिनं रोहित शर्माचा एक महत्त्वपूर्ण विक्रम मोडला. ती आता टी–२० आंतरराष्ट्रीय (पुरुष किंवा महिला) सामन्यांमध्ये भारताची सर्वाधिक धावा करणारी खेळाडू बनली आहे. यापूर्वी हा विक्रम टीम इंडियाचा महान फलंदाज रोहित शर्माच्या नावावर होता. डरबनमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं १५७ धावा केल्या. यजमान दक्षिण आफ्रिकेनं १९.१ षटकांत हे लक्ष्य पूर्ण करुन मालिकेत १–० अशी आघाडी घेतली.टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये रोहित शर्मा आणि स्मृती मंधानाचा विक्रम कसा : रोहित शर्मानं २०२४ मध्ये टी–२० विश्वचषक जिंकल्यानंतर या फॉर्मॅटमधून निवृत्ती घेतली. निवृत्त होण्यापूर्वी, रोहितने १५९ सामन्यांमध्ये पाच शतकं आणि ३२ अर्धशतकांसह ४,२३१ धावा केल्या होत्या. आता, मंधानानं त्याचा विक्रम मोडला आहे. स्मृती मंधानाने १६१ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एक



शतक आणि ३३ अर्धशतकांसह ३०.५३ च्या सरासरीनं आणि १२४.४५ च्या स्ट्राइक रेटनं ४,२४४ धावा केल्या आहेत.महिलांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये कोणत्या खेळाडूनं केल्या सर्वाधिक धावा : महिलांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत स्मृती मंधाना न्यूझीलंडच्या सुझी बेट्सनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. बेट्सनं आपल्या कारकिर्दीत १८१ सामन्यांमध्ये ४,७१७ धावा केल्या आहेत. १६१ सामन्यांमध्ये ४,२४४ धावांसह मंधाना या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. टीम इंडियाची हरमनप्रीत कौर तिसऱ्या क्रमांकावर आहे. तिनं आतापर्यंत १९१ सामन्यांमध्ये ३८६९ धावा केल्या आहेत. श्रीलंकेची चमारी अटापट्टू १५४ सामन्यांमध्ये ३६३७ धावांसह या यादीत चौथ्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडची सोफी डिव्हाईन १५१ सामन्यांमध्ये ३५८७ धावा करुन या यादीत पाचव्या क्रमांकावर आहे.**पहिल्या सामन्यात भारताचा पराभव :** सामन्याबाबत बोलायचे झाल्यास, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला आल्यानंतर भारताला निर्धारित २० षटकांत ७ गडी गमावून केवळ १५७ धावाच करता आल्या. मंधाना लवकर बाद झाल्यानंतर, शेफाली वर्मान २० चेंडूंमध्ये ३४ धावा केल्या, तर जेमिमा रॉड्रिग्जने ३६ धावा केल्या. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने ४७ धावा केल्या आणि ती नाबाद राहिली. १५८ धावांचे लक्ष्य गाठताना दक्षिण आफ्रिकेची सलामीवीर आणि कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने अर्धशतक झळकावले. तिने ३९ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. अनेरी डर्कसनने ४४ धावा करुन संघाला विजय मिळवून दिला. मालिकेतील दुसरा टी–२० सामना १९ एप्रिल रोजी त्याच मैदानावर खेळला जाईल.

## डेव्हिड मिलरने गुजरात टायटन्सचा काढला वचपा : गुजरातच्या पुढे चौथ्या स्थानावर मुसंडी



मुंबई–डेव्हिड मिलरने अखेरच्या षटकात दोन दणदणीत षटकार खेचत दिल्ली कॅपिटल्सला ६ विकेट्सने विजय मिळवून दिला. डेव्हिड मिलरला गुजरात टायटन्सविरूद्ध उत्कृष्ट खेळी केल्यानंतर अखेरच्या चेंडूवर दिल्लीला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला होता. पण आता त्या पराभवाचा वचपा मिलरने आरसीबीविरूद्ध काढत दिल्ली कॅपिटल्ससाठी विजयाचा हिरो ठरला. पुन्हा एकदा आरसीबीसाठी हिरवी जर्सी अनलकी ठरली आहे. आरसीबीने हिरवी जर्सी घातल्यानंतर अनेक सामने गमावले आहेत.
अखेरच्या षटकात दिल्लीला विजयासाठी १४ धावांची गरज होती. रोमारियो शेफर्डकडे गोलंदाजीची जबाबदारी सोपवण्यात आली होती. रोमारियो पहिले दोन्ही चेंडू कमालीचे टाकत १–१ धावा दिल्या. यानंतर तिसरा चेंडू शेफर्डने फुल टॉस टाकला आणि मिलरने चेंडू षटकारासाठी पाठवला. यानंतर चौथ्या चेंडूवरही मिलरने षटकार खेचला. यासह विजयासाठी अखेरच्या दोन चेंडूत एका धावेची गरज होती आणि मिलरने अखेरच्या चेंडूवर चौकार खेचला आणि दिल्लीने ६ विकेट्सने विजय मिळवला.
आरसीबीने दिलेल्या १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात खूपच खराब झाली. भुवनेश्वर कुमारने पहिल्या २ षटकांत ३ विकेट्स घेतल्या. केएल राहुलने वाढदिवसादिवशी अर्धशतकी खेळी केली. राहुलने ३४ चेंडूत ६ चौकार व २ षटकारासह ५७ धावांची खेळी केली. तर ट्रिस्टन स्टब्स अर्धशतक करत मैदानावर कायम होता. अक्षर पटेल २६ धावा करत रिटायर्ड हर्ट झाला. तर अक्षर रिटायर्ड हर्ट झाल्यानंतर फलंदाजीला आला. डेव्हिड मिलर अखेरीस संघाला रोमहर्षक विजय मिळवून देत माघारी परतला. मिलरने १० चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह २२ धावांची खेळी केली. तर ट्रिस्टन स्टब्स नाबाद परतला. स्टब्सने संघाचा डाव सावरत ४७ चेंडूत ४ चौकार आणि एका षटकारासह ६० धावा केल्या.
दिल्लीने नाणेफेक जिंकत आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. आरसीबीने सावध सुरूवात केली, पण दिल्लीने ठराविक अंतराने फलंदाजांना बाद करत धावांवर अंकुश ठेवला. विराट कोहली अवघ्या १९ धावा करत बाद झाला. तर फिल सॉल्टने ३८ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांसह ६३ धावांची खेळी केली. तर देवदत्त पडिक्कलने १८ धावांचं योगदान दिलं. तर टीम डेव्हिडने २६ आणि जितेश शर्माने १४ धावांचं योगदान दिलं. कृणाल पंड्याने १२ धावांचं योगदान दिलं. यासह २० षटकांत आरसीबीने ८ बाद १७५ धावा केल्या आहेत. तर दिल्लीकडून अक्षर पटेल, कुलदीप यादव, लुंगी एन्गिडी यांनी प्रत्येकी २–२ विकेट्स घेतल्या. तर मुकेश कुमारने १ विकेट घेतली.
मात्र, हिरव्या जर्सीत खेळताना आरसीबीची कामगिरी चांगली राहिलेली नाही. २०११ पासून, आरसीबीने हिरव्या जर्सीत एकूण १५ सामने खेळले असून, त्यापैकी केवळ पाच सामने जिंकले आहेत. त्यांना नऊ सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला असून, एक सामना अनिर्णित राहिला आहे. गेल्या हंगामात, आरसीबीने हिरव्या जर्सीत राजस्थान रॉयल्सला नऊ गडी राखून पराभूत केले होते.

# लातूरच्या वृक्ष चळवळीचे जनक दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त दुर्मिळ झाडांची देवराई साकारणार

## मांजरा देवराई येथे १०० दुर्मिळ वृक्षांच्या रोपणाचा शुभारंभ; भारत माँ की एक पुकार, बच्चे कम हो पेड हजारचा नारा पुन्हा गुंजला

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात खऱ्या अर्थाने वृक्ष चळवळ रुजवणारे संवेदनशील नेतृत्व, सहकार महर्षी आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा देवराई येथे शंभर दुर्मिळ झाडे लावण्याच्या प्रकल्पाचा शानदार शुभारंभ करण्यात आला. औसा रोड येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालया समोरील परिसरात हा कार्यक्रम पार पडला.

दिलीपरावजी देशमुख यांनी १९९३ मध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष असताना लातूर शहरात वृक्षारोपणाची मोठी मोहीम हाती घेतली होती. ''भारत माँ की एक पुकार, बच्चे कम हो पेड हजार'' हे त्यांनी दिलेले घोषवाक्य आजही लातूरकरांच्या स्मरणात आहे. जुना जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जिल्हा परिषद ते हरंगुळ रेल्वे स्टेशनपर्यंत लावलेली पिंपळाची हजारो झाडे आणि तहसील कार्यालय, सरस्वती कॉलनी परिसरातील २०० हून अधिक आकाश मोगरा (बूच) झाडे आजही साहेबांच्या निसर्गप्रेमाची साक्ष देत आहेत.

साहेबांच्या कल्पनेतून जिल्हा परिषद परिसरात अवघ्या पाच-सहा फ ुटांच्या अंतरावर लावलेली शेकडो आकाश मोगऱ्याची झाडे आजही लातूरमध्ये एखाद्या हिल स्टेशनवर असल्याचा अनुभव देतात. जिल्हा क्रीडा संकुल, नाना-नानी पार्क आणि एस. आर. देशमुख नगराध्यक्ष असताना शहरात लावलेली विविध झाडे ही दिलीपरावजींच्या दूरदृष्टीचे फळ आहे. साहेबांच्या या आवडीचा सन्मान करत आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त दुर्मिळ वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला. मांजरा देवराई येथे यापूर्वी ६००० हून अधिक झाडे यशस्वीपणे जतन करण्यात आली आहेत. आता याच ठिकाणी दुर्मिळ झाडांचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. या उपक्रमात लातूर वृक्ष चळवळ, सह्याद्री देवराई, चैतन्य हास्य मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ आणि सनराईज सामाजिक संस्था यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी सह्याद्री देवराई व लातूर वृक्ष चळवळीचे समन्वयक सुपर्ण जगताप, ॲड. कालिदासराव देशपांडे, आर्किटेक्ट कृष्णकुमार बांगड, प्रकाश गादगीने, प्रभाकर जाधव, डॉ. दशरथ भिसे, भीम दुनगावे, स्नेहा निकम, संतोष पोतले, कैलास पंडित, आशिष देशमुख, महादेव गिरी, पंढरीनाथ नागिमे, बाळासाहेब मारवने, मानकर सर, अमृत सोनवणे,




दीपक मंदाडे, रितेश चापसी, ॲड. सुनील गायकवाड यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व निसर्गप्रेमी उपस्थित होते.

# दयानंद विज्ञानमध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत गुरुतत्त्वम समुपदेशन कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१५ एप्रिल २०२६ रोजी नवीन शैक्षणिक धोरणानुसार फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत गुरुतत्त्वम समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.या समुपदेशन सत्रामध्ये समुपदेशक वैशाली देशमुख यांनी शिक्षकांनी मार्गदर्शकाच्या भूमिकेत कशाप्रकारे काम केले पाहिजे, याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.शिक्षक, प्राध्यापकांनी केवळ अभ्यासक्रम शिकविण्यावर भर न देता गुरु-शिष्य परंपरेच्या ज्ञानावर आणि आधुनिक कौशल्य आधारित अध्यापनावर आधारित मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे सर्वांनी लक्ष केंद्रित करण्याबद्दल माहिती दिली.''गुरुतत्त्वम'' या कार्यक्रमाद्वारे गुरु-शिष्य नात्याची बांधिलकी जपणे का आवश्यक आहे हेही पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी,विषयाचे सखोल ज्ञान, शस्त्र व शास्त्र याविषयीचे ज्ञान,भाषेचे ज्ञान, स्वतः ची जबाबदारी, चुका दुरुस्त कशा करायच्या याविषयीचे ज्ञान देऊन गुणवंत विद्यार्थी घडविणे शिक्षक, प्राध्यापकांची जबाबदारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य प्रा.बी.ए.सरवदे यांनी अध्यक्षीय समारोप करताना प्रत्येक शिक्षक,प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी जवळीकता साधून मेंटार होऊन विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली पाहिजे,असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांचेही सहकार्य लाभले.या कार्यक्रमास पर्यवेक्षक डॉ.वरुडकर एच.ए.आणि पर्यवेक्षिका डॉ.एस.पी.कोल्हे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,वाणिज्य महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. सुभाष मोरे,प्रशासकीय अधिकारी प्रा.ऋतुजा देशमुख, प्रा.सुवर्णा कारंजे व दयानंद विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व प्राध्यापक यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सहकार महर्षी मा.श्री.दिलीपरावजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृहात अन्नधान्य वाटप




**लातूर/प्रतिनिधी :** सहकार महर्षी मा.श्री.दिलीपरावजी देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज लातूरमध्ये विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर (निवळी) यांच्या वतीने शहरातील संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृहात अन्नधान्य वाटप करून सामाजिक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

शनिवार, १८ एप्रिल रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या या कार्यक्रमाला माजी आमदार तथा कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे व कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कारखान्याचे संचालक आणि मान्यवरांनी अनाथ मतिमंद मुलांचे बालगृहातील मुलांशी संवाद साधून त्यांना अन्नधान्य वाटप करण्यात आले.

याप्रसंगी कारखान्याचे संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, सतिष शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, शाम बरुरे, सुभाष माने व रमेश देशमुख, संस्थेचे अध्यक्ष अण्णासाहेब कदम, मुख्याध्यापक पंडीत लोहरे, नितीन वाघ आणि कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी क्षेत्रात उद्योजकतेच्या असंख्य संधी - प्रा. हरिहर गायके

## विद्यार्थी उद्योजकता या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** रेशीम उद्योग, कुक्कुटपालन, शेळीपालन आणि दुग्ध व्यवसाय हे ग्रामीण भागातील तरुणांसाठी अत्यंत लाभदायक व टिकाऊ पर्याय आहेत. कमी भांडवलातूनही हे व्यवसाय सुरू करता येतात आणि योग्य नियोजन व मेहनतीच्या जोरावर मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवता येते. ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून स्वावलंबी उद्योजक बनण्याचा आत्मविश्र्वास बाळगावा. असे प्रतिपादन प्रा. हरिहर गायके यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित एक दिवसाच्या विद्यार्थी उद्योजकता या कार्यशाळेत केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे वाणिज्य आणि कला शाखेच्या वतीने आयोजित एक दिवसाच्या विद्यार्थी आणि उद्योजकता या कार्यशाळेचे




आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. पुढे बोलताना प्रा. गायके म्हणाले आपला भारत देश कृषीप्रधान आहे आणि देशाची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. अलीकडच्या काळात ग्रामीण भागात वैज्ञानिक तंत्रज्ञान आणि सुविधा मोठ्या प्रमाणात पोहोचल्यामुळे कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. या बदलांची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्रातील संधी ओळखून उद्योजकतेकडे वळले पाहिजे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी नोकरीच्या संधींपलीकडे जाऊन उद्योजकतेकडे वळले पाहिजे. महाविद्यालय अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन करत राहील. बचत गटांच्या माध्यमातून चालणारे उद्योग हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळ आहेत, त्यातूनही विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. ग्रामीण भागातील अगदी कमी शिक्षित महिला देखील बचत गटांच्या माध्यमातून छोटे-छोटे व्य lpanhalkar99gmail.com वसाय उभे करून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल करत आहेत. ही बाब प्रेरणादायी असून, यासाठी पुढील काळात परिसरातील महिला बचत गटांना एकत्रित करून महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या माध्यमातून त्यांचे प्रबोधन व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. महारुद्र बिडवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कल्याणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अंकिता वाडकर यांनी मानले. या कार्यशाळेला विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. शिल्पा हालशिकर, दत्ता फुलगामे, नितीन पाटील यांनी प्रयत्न केले. या कार्यशाळेमध्ये कला आणि वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# नीलम गोऱ्हे फिक्स; विधानपरिषदेच्या दुसऱ्या जागेसाठी शिवसेनेत टोकाची स्पर्धा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यसभा निवडणुकीत अनुभवी नेत्यांना डावलून सामान्य शिवसैनिकाला संधी देणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विधानपरिषद निवडणुकीतही पुन्हा एकदा 'धक्कातंत्र' वापरण्याची शक्यता आहे. विधानपरिषदेसाठी मावळत्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांची उमेदवारी निश्चित मानली जात असली, तरी दुसऱ्या जागेसाठी मात्र शिवसेनेत इच्छुकांनी शड्डू ठोकल्याने पक्षात कमालीची चुरस निर्माण झाली आहे.

विधानपरिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर होणार आहे. शिवसेनेचे विधानसभेतील ५७ आमदारांचे संख्याबळ पाहता, दोन जागा सहज निवडून आणणे शिंदे यांच्यासाठी सोपे आहे. यातील एक जागा नीलम गोऱ्हे यांच्यासाठी जवळपास पक्की असली, तरी दुसऱ्या जागेवर कोणाची वर्णी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेनेच्या कोट्यातील दुसऱ्या जागेसाठी पक्षातील बड्या नेत्यांमध्ये स्पर्धा सुरू आहे. यामध्ये प्रामुख्याने रवींद्र फाटक, संजय मोरे, किरण पावसकर, शीतल म्हात्रे, शायना एनसी आणि दीपक सावंत यांच्या नावांची चर्चा आहे.

# लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई आणि सुलतानपूर / वाराणसी दरम्यान रेल्वे ३४ अतिरिक्त उन्हाळी विशेष सेवा चालवणार

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई आणि सुलतानपूर / वाराणसी दरम्यान रेल्वे ३४ अतिरिक्त उन्हाळी विशेष सेवा चालवणार उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांच्या अधिक सोयीसाठी रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई आणि सुलतानपूर / वाराणसी दरम्यान ३४ अतिरिक्त उन्हाळी विशेष सेवा चालवणार आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई - सुलतानपूर - लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई साप्ताहिक विशेष (१८ सेवा) गाडी क्रमांक ०४२११ ही साप्ताहिक विशेष दिनांक २१.०५.२०२६ ते १६.०७.२०२६ पर्यंत दर गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथून १४:३५ वाजता सुटेल आणि सुलतानपूर येथे दुसऱ्या दिवशी २३:०० वाजता पोहोचेल (९ सेवा).



गाडी क्रमांक ०४२१२ साप्ताहिक विशेष दिनांक २०.०५.२०२६ ते १५.०७.२०२६ पर्यंत दर बुधवारी सुलतानपूर येथून ०४:०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १२:२० वाजता पोहोचेल. (९ सेवा).

थांबे:- ठाणे, कल्याण, नाशिक रोड, चाळीसगाव, पाचोरा, भुसावळ, खंडवा, इटारसी जंक्शन, राणी कमलापती, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ओरई, कानपूर सेंट्रल आणि लखनऊ.

लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई - वाराणसी - लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई साप्ताहिक विशेष (१६ सेवा)

गाडी क्रमांक ०४२२५ साप्ताहिक विशेष दिनांक २२.०५.२०२६ ते १०.०७.२०२६ पर्यंत दर शुक्रवारी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथून १४:३५ वाजता सुटेल आणि वाराणसी येथे तिसऱ्या दिवशी ०२:०५ वाजता पोहोचेल (८ सेवा).

गाडी क्रमांक ०४२२६ साप्ताहिक विशेष दिनांक २१.०५.२०२६ ते ०९.०७.२०२६ पर्यंत दर गुरुवारी वाराणसी येथून ०१:३५ वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १२:२० वाजता पोहोचेल (८ सेवा).

थांबे:- ठाणे, कल्याण, नाशिक रोड, चाळीसगाव, पाचोरा, भुसावळ, खंडवा, इटारसी जंक्शन, राणी कमलापती, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ओरई, कानपूर सेंट्रल, लखनऊ, सुलतानपूर आणि जौनपूर सिटी.

गाडी क्रमांक ०४२११/ ०४२१२ आणि गाडी क्रमांक ०४२२५/ ०४२२६ साठीची संरचना: १४ वातानुकूलित तृतीय इकॉनॉमी, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ जनरेटर व्हॅन.

आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०४२११ आणि गाडी क्रमांक ०४२२५ साठी बुकिंग सुरू आहे.

सर्वसाधारण शुल्कासह अनारक्षित डब्यांचे बुकिंग यूटीएस (UTS) प्रणालीद्वारे करता येईल.

प्रवासी तिकीट बुकिंगसाठी रेलवन (RailOne) पचा वापर देखील करू शकतात.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा एनटीईएस (NTES) प डाउनलोड करा.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जान्हवी अंबरला राष्ट्रीय परिषदेत बेस्ट पेपर अवॉर्ड

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर येथील जैवतंत्रज्ञान विभागातील जान्हवी अंबर या विद्यार्थिनीने चंदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेत उत्कृष्ट यश संपादन केले, याकरिता तिचा सत्कार करण्यात आला.चंदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,शिरूर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षतर्फे दि.१३ व १४ मार्च २०२६ रोजी हायर एज्युकेशन अँन्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात



आले होते.या परिषदेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपले संशोधन सादर केले.या परिषदेत जान्हवी अंबर हिने फ्रॉम बॅगॅस टू बायोडिग्रेडेबल पेपर : अ सस्टेनेबल वेस्ट-टू-वेल्थ ॲप्रोच फॉर ग्रीन आंत्रप्रेन्युअरशिप या विषयावर पोस्टर सादरीकरण केले. तिच्या सादरीकरणाला तांत्रिक सत्रामध्ये बेस्ट पेपर पुरस्काराने गौरविण्यात आले.

त्याबद्दल महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी जान्हवी अंबर हिला प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नीट समन्वयक डॉ. कोमल गोमारे, विभागप्रमुख डॉ. फिरदौस बिरादार, पदव्युत्तर समन्वयक प्रा. स्वरुप गावकरे, प्रा. अनुराधा शिंदे, प्रा. ऋतुजा डिग्रस्कर, प्रा. तृप्ती सोनकांबळे व प्रा. आऊ येळीकर आदी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचा ७६ वा वाढदिवस मांजरा साखर कारखाना येथे मोठ्या उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, विलासनगर (ता. जि. लातूर) येथे कारखान्याचे चेअरमन तथा माजी मंत्री सहकारमहर्षी मा. श्री. दिलीपराव देशमुख साहेब यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रम उत्साहात व मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश मंदिर येथे अभिषेकाने झाली. त्यानंतर मांजरेश्वर मंदिर येथे आरती व अभिषेक पार पडला.यासोबतच वन्य प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली, ज्यामुळे पर्यावरण व जीवसृष्टीबाबतची सामाजिक जाणीव अधोरेखित झाली. तसेच आंबा रोपांचे वाटप देखील करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.





सायंकाळी मातोश्री वृद्धाश्रम येथे स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत आनंददायी वातावरणात सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

संपूर्ण दिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी भारलेला हा कार्यक्रम परिसरातील नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे,२१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख,विरसेन भोसले,व्हा चेअरमन अशोकराव काळे, माजी व्हा चेअरमन श्रीशैल्य उटगे, ऊस विकास समिती अध्यक्ष कैलास पाटील, तात्यासाहेब देशमुख, वसंत उफाडे, सदाशिव कदम, अनिल दरकसे, मदन भिसे, धनराज दाताळ ,शंकरराव बोळंगे, निळकंठ बचाटे, नवनाथ काळे,सचिन शिंदे, ज्ञानेश्वर पवार, बालाजी पांढरे, दयानंद बिडवे,भैरू कदम तज्ञ संचालक कदम सुरेश चव्हाण, श्रीकृष्ण काळे, विलास चामले, अरुण कापरे तक्रार निवारण समिती अध्यक्ष तानाजी जाधव, कार्यकारी संचालक पंडित देसाई कामगार प्रतिनिधी शत्रुघ्न पाटील, खाते प्रमुख, अधिकारी,कर्मतारी आदींची उपस्थिती होती.

## कोंबिंग ऑपरेशनमध्ये २५ आरोपी जेरबंद:दोन दिवसांत २४९ वाहनांची तपासणी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने १६ व १७ एप्रिल रोजी विशेष 'कोंबिंग ऑपरेशन' व नाकाबंदी राबवण्यात आली. या दोन दिवसीय मोहिमेत पोलिसांनी २५ फरार आरोपींना ताब्यात घेण्याची मोठी कामगिरी केली आहे. मोहिमेसाठी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स्वतः उपस्थित राहून नेतृत्व करत होते. कारवाईपूर्वी रात्री १०.३० वाजता सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सविस्तर सूचना देऊन ब्रीफिंग करण्यात आले.

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त १०२ कर्मचाऱ्यानी केले रक्तदान

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिल्हा बँक कर्मचारी व गट्सचिव संघटनेच्या वतीने जिल्हा बँकेच्या मुख्यालयात शनिवारी रक्तदान शिबिर घेण्यात आले या रक्तदान शिबिरात १०२ कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला तत्पूर्वी रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी आमदार वैजनाथराव शिंदे व जिल्हा बँकेचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील माजी जिल्हा

### जिल्हा बँक कर्मचारी व गट्सचिव संघटनेचा पुढाकार

परिषद अध्यक्ष संतोष देशमुख यांच्या सह मान्यवर यांच्या उपस्थितीत करण्यात आले लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, संचालक पृथ्वीराज सिरसाठ अशोक गोविन्दपूरकर अँड राजकुमार पाटील,कार्यकारी संचालक हणमंत जाधव,पंचायत समितीच्या सभापती श्री बैले उपसभापती महेश चव्हाण,जिल्हा परीषद सदस्य दत्तात्रय टेकाळे, जिल्हा परीषद सदस्य श्रीकांत (बाळू) माने, कोंग्रेसचे तालुकाध्यक्ष उमेश बेद्रे, डॉ उमाकांत जाधव युवक कोंग्रेसचे अध्यक्ष पाटील, अँड कालिदास देशपांडे,संभाजी सुळ सचिन दाताळ हरीराम कुलकर्णी यांच्या सह मान्यवर उपस्थित होते



# 'करियर कट्टा'च्या जिल्हा समन्वयकपदी डॉ. शिवप्रसाद डोंगरे



**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील वाणिज्य विभागात कार्यरत असलेले प्रोफेसर डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांची महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'करियर कट्टा' या उपक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यासाठी जिल्हा समन्वयक (शहर) म्हणून निवड करण्यात आली आहे.

डॉ. डोंगरे यांची शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात भक्कम वाटचाल असून यांना ३० वर्षाचा शैक्षणिक अनुभव आहे. तसेच त्यांच्या नावे चार पेटंट्स नोंदणीकृत आहेत आणि त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये साधनव्यक्ती म्हणून कार्य केले आहे. भूतान व थायलंड या देशाचा शैक्षणिक दौराही त्यांनी केला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून त्यांना तीन लघुशोध प्रबंध प्राप्त झाले असून ते त्यांनी पूर्ण केलेले आहेत. त्यांनी 'वाणिज्य व व्यवस्थापन' या विषयावर पाच पुस्तके लिहिलेली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखली तीन विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी पूर्ण केलेली असून उर्वरित पाच विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे काम उत्तमरित्या करीत आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कमला कॉलेज, कोल्हापूर या ठिकाणच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विषयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून ते कार्यरत आहेत.

भारतीय वाणिज्य परिषद, नवी दिल्ली दिल्लीचे कार्यकारी संचालक होते व महाराष्ट्र कॉमर्स टीचर्स असोसिएशन, मुंबईच्या कार्यकारी संचालक मंडळावर सदस्य म्हणून आहेत. युथ इम्पॉवरमेंट अँड रिसर्च असोसिएशन, वाराणसी – महाराष्ट्र चाप्टरचे जॉइंट सेक्रेटरी आहेत.

मागील पंधरा वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने त्यांना 'उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी' म्हणून पुरस्कारीत केलेले आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक म्हणून कार्य केले आहे. त्यांना अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांनी उत्कृष्ट शिक्षक म्हणून सन्मानित केलेले असून अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैकणिक प्रतिष्ठानावर त्यांनी कार्य केले व करीत आहेत. त्यांनी वेगवेगळ्या विषयावर अनेक व्याख्याने दिलेली आहेत. विशेषतः ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी करिअर कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. याच कार्याची दखल घेऊन लातूर जिल्ह्यात त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या महाविद्यालयामध्ये 'करिअर कट्टा उपक्रम' यशस्वीपणे राबविला जावा, यासाठी उच्च शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या वतीने डॉ. डोंगरे यांची 'जिल्हा समन्वयक शहर' म्हणून निवड केलेली आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. डोंगरगे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कररेड्डी, डॉ. आनंद शेवाळे, डॉ. व्ही. आर. सोनी, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. संजय गवई तसेच महविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# ममदापूर येथील समाधान शिबिरात अनेकांना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ

**लातूर/प्रतिनिधी :** देशाची यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि विकास पुरुष राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत असून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिरातून जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेला समाधान द्यावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर येथे कासारखेडा मंडळाच्या आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले. याप्रसंगी तहसिलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, भाजपा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, शिव पाणंद रस्ता समिती सदस्य सुरज शिंदे, अनिल भिसे, दिपक वांगस्कर, गोविंद नरहरे, विजयकुमार मलवाडे हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विविध गावचे सरपंच, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसवण्णा ..

वीर शैव बसवण्णा
तत्वज्ञान विवेकवादी
मान्य नव्हते मुळीचं
कर्मकांड जुने यज्ञादि

भुमिका क्रूर स्विकारे
जन वेद प्रामाण्यवादि
उलटी चालती माणसे
ती शब्द प्रामाण्यवादि

जाती धर्मा तेढ वाढवे
कु प्रथा विषमतावादी
यज्ञा अन्नाची नासाडी
अकारण मानसव्याधि

बळीच्या निमीत्ताने ते
मुके प्राणी चढले वेदी
अमानूष प्रथा व्यथेतून
मानव बनला अपराधी

स्विकारे उघड्या डोळी
तत्वबुध्दीप्रामाण्यवादी
बसव वचने जाणावीत
सावरे मनुजा पदोपदी

दासोहाचा समानतेचा
संदेश करे बंधुत्व वृध्दी
कायिकवाचिकअहिंसा
तल्लख बनवते बुध्दी

देहास मानतो देवालय
कुलशरण यज्ञ विरोधी
अनुभवमंटप उभारणी
जगतास करी आनंदी

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

# नणंदमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा तालुक्यातील नणंद या गावांमधील मराठा लिंगायत माळी व मुस्लिम तरुणांनी एकत्र येऊन जगतज्योती महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती १४ एप्रिल म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनी विविध उपक्रम राबवीत मोठ्या उत्साहाने केली साजरी नणंद ग्रामस्थ व मान्यवरांच्या उपस्थितीत निलंगा पंचायत समितीच्या नुतन सभापती डॉ सौ वाघमारे मॅडम यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमांचे पूजन करून सरपंच हरिदास बोळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यानंतर राष्ट्रगीत व संविधान उद्देशकेचे सामुहिक वाचन करून पंचशील ग्रहण करण्यात आले.आपल्या भाषणात सभापती म्हणाल्या की गावातील विविध जातीतील तरुणांनी एकत्र येऊन सर्वंच महापुरुषांची जयंती साजरी करून जिल्ह्यात एक आदर्श निर्माण केला असून याच मार्गाने आपली वाटचाल सुरू राहिल्यास डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला समाज निर्माण होईल असे उद्गगार त्यांनी काढले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांकरिता प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक:- SUR/TD/T/2026/10. कामाचे नाव:-** सोलापूर विभागातील टर्नआउट आणि क्रॉसओव्हर ठिकाणांवर १०५ चौ. मिमी. जंपरच्या जागी १६० चौ. मिमी. जंपर बसवून OHE अद्ययावतीकरण करणे. **अंदाजित खर्च:-** ५,११,१००/-. **कामाचा कालावधी:-** १२ महिने. **निविदा सुरक्षा:-** ६० दिवस. **प्रस्तावाची वैधता:-** ६० दिवस. **संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:-** १२/०५/२०२६ रोजी १५.०० वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)सोलापूर**
18
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**
**निविदा सूचना क्र. SUR-NC-CR-SNT-C-S-01-2027 दिनांक १६-०४-२०२६**

सहाय्यक विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामाकरिता पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन खुल्या ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **१. ई-निविदा क्र.:-** SUR-NC-CR-SNT-C-S-01-2027 दिनांक १६-०४-२०२६, **२. कामाचे नाव:-** मनमाड स्थानकावरील ROR जोडणीच्या कनेक्टिव्हिटी संदर्भात इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (अंतर्गत आणि बाह्य दोन्ही प्रकारचे सिग्नलिंग साहित्य) उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेला पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन; तसेच DD-MMR दुपदरीकरण कामाच्या संदर्भात DD-MMR विभागातील संबंधित उर्वरित कामे. **३. कामाचा अंदाजित खर्च:-** रु. १५,४९,८५,८७८.७५ (अक्षरी: पंधरा कोटी एकोणपन्नास लाख पंचाऐंशी हजार आठशे अठ्ठ्याहत्तर रुपये आणि पंच्याहत्तर पैसे फक्त). **४. निविदा अर्जाची/पुस्तिकेची किंमत:-** रु. ०.००, **५. अनामत रक्कम:-** रु. ३०,९९,७००.००/- (अक्षरी: तीस लाख निन्न्याण्णव हजार सातशे रुपये फक्त), **६. काम पूर्ण करण्याचा कालावधी:-** LOA जारी केल्याच्या दिनांकापासून ०९ महिने (नऊ महिने). यामध्ये पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. **७. निविदा सादर करण्यास सुरुवात होण्याचा दिनांक:-** दिनांक: २४.०४.२०२६, **८. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:-** दिनांक: ०८.०५.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत, **९. निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळ:- दिनांक:** ०८.०५.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत, **१०. निविदेचा संपूर्ण तपशील उपलब्ध असलेली संकेतस्थळ:-** www.ireps.gov.in

**A.D.S.T.E. (C)/सोलापूर**
15
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलींग कामे**
**ई-निविदा सूचना**
**निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-03**
**दिनांक: १५.०४.२०२६**

DRM (S&T) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर **www.ireps.gov.in** येथे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित केल्या जात आहेत: **अनु. क्र.:- १., कामाचे नाव व ठिकाण:-** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील लातूर-लातूर रोड सेक्शनमध्ये घामी (प्रस्तावित नवीन ब्लॉक स्टेशन) येथे इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची सुविधा उपलब्ध करून देणे., **निविदा क्र.:-** SUR-N-T-2026-27-03, **कामाचा अंदाजित खर्च:-** रु. ८,६७,२२,८९८.४९, **निविदा अर्जाची किंमत:-** शून्य, **जमा करावयाची अनामत रक्कम** (EMD):- रु. १७,३४,५००, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:-** १२ महिने, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:-** ०८/०५/२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर., कामाचा सविस्तर तपशील IREPS संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेबाबत काही शुद्धिपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच प्रसिद्ध केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष, टपालाद्वारे, ई-मेलद्वारे, फॅक्सद्वारे किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग-३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटी या पर्यायांचा स्वीकार केला जाईल; तसेच, बँक गॅरंटीच्या मूळ प्रतीची निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त इतर दिवशी), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन सुपूर्द करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

**DRM S&T शाखा, सोलापूर**
16
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ब्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६